५७५
६।१९९

श्री सयाजी बाल

छत्रपति

# संभाजी महाराज

४७

च-२८८
००६२४

श्रीसयाजी बालज्ञानमाला-पुष्प ४७ वें.

चरित्र-गुच्छ.

# छत्रपति
# संभाजी महाराज.

लेखकः

केशव मंगेश रांगणेकर, बी. ए.

रेफरन्स लायब्रेरियन, सेंट्रल लायब्ररी, बडोदें.

' इंग्रज लोकांचा संक्षिप्त इतिहास ' या पुस्तकाचा कर्ता.

प्रकाशकः

एम्. सी. कोठारी,

कापडीपोळ, रावपुरा--बडोदें.

बडोदें येथें ' जागृति ' छापखान्यांत रा. भ. ब. पाळेकर यांनीं प्रकाशकाकरितां छापिलें ता. २५-७-२४.

इ. स. १९२४ } किंमत { प्रथमावृत्ति.
संवत् १९८०. } रु. ०-६-० { प्रति ५००

# जाहीरात.

आपल्या देशी भाषेच्या साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें श्रीमंत सरकार महाराजसाहेब श्रीसयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादुर, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. ई., एल. एल. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून प्राथमिक शिक्षण संपादन करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना बोधप्रद होईल असें सरळ आणि सोप्या भाषेंत विविधविषयावरील लोकसाहित्य तयार करून तें "श्रीसयाजीबालज्ञानमाले"तर्फे प्रसिद्ध करण्याची योजना केली आहे.

या योजनेस अनुसरून रा. रा. केशव मंगेश रांगणेकर बी. ए. यांजकडून छत्रपति संभाजी महाराज यांचें चरित्र तयार करवून सदरहु मालेच्या चरित्र--गुच्छाचें सत्तचाळीसावें पुष्प विद्याधिकारी कचेरींतील भाषांतर शाखेच्या ठरलेल्या धोरणानें संशोधित करून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| भाषांतर शाखा,<br>विद्याधिकारी कचेरी,<br>बडोदें.<br>ता. २८-७-१९२४ | ज. पु. जोषीपुरा.<br><br>भा. म. | नं. के. दीक्षित.<br>विद्याधिकारी<br>बडोदें राज्य. |

६/१९९

# प्रस्तावना.

हल्लींच्या महर्गतेच्या काळीं मध्यम स्थितींतील लोकांस नोकरी करून मिळणाऱ्या अल्प वेतनांत संसारशकट चालविणें किती कठीण झालें आहे हें सर्वांस विदित आहेच. विशेषतः मला तें अत्यंत कठीण झालें असल्यानें, वाङ्मय-सेवेच्या उच्च हेतूनें नव्हे परंतु केवळ अधिक द्रव्य मिळविण्याच्याच लोभानें मी लेखक बनण्याचा विचार केला. प्रस्तुत पुस्तक हें त्याचेंच फळ होय.

लेखक बनण्याच्या माझ्या हेतूस प्रोत्साहन दिल्याबद्दल प्रथमतः बडोदें राज्यांतील विद्याधिकारी कचेरींतील भाषांतर शाखेच्या अधिकाऱ्यांचे मदतनीस रा. रा. भानुसुखराम निर्गुणराम मेहेता यांचा मी अत्यंत आभारी आहें. प्रस्तुत चरित्र लिहितांना रा. रा. गो. स. सरदेसाई, ग्रँट डफ, किंकेड वगैरे वगैरे इतिहासकारांच्या कृतींचा मी लाभ घेतला याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे. शिवाय बडोद्यां-

तील सेंट्रल लायब्ररी खात्याच्या सरस्वतीमंदिरांतच माझी नोकरी असल्यानें त्यांत असलेल्या व उत्तरोत्तर नवीन येत असलेल्या ग्रंथांच्या केवळ दर्शनानें लेखक बनण्याची मला स्फूर्ति झाली याबद्दल त्या सरस्वतीमंदिराचा मी तितकाच किंबहुना जास्त ऋणी आहे.

वरील हकीगतीवरून ध्यानांत येईल कीं, पुस्तक लिहिण्याचा माझा हा अगदीं प्रथम प्रयत्न आहे. यामुळें पुस्तकाच्या भाषेंत अगर वर लिहिलेल्या इतिहासकारांच्या पुस्तकांतून मिळविलेली माहिती व्यवस्थित रीतीनें ग्रथित करण्यांत वगैरे माझ्या पुष्कळ चुका होण्याचा संभव आहे. तरी त्याबद्दल वाचकांनीं मला क्षमा करावी, अशी त्यांस नम्र विनंति आहे.

सिद्धनाथ, बडोदें. केशव मंगेश रांगणेकर

ता. २१--७--१९२४. ग्रंथकर्ता.

श्री.

# छत्रपति संभाजी.

मुलांनों, महाराष्ट्रामध्यें गोब्राह्मणांस मुसलमानांच्या त्रासापासून सोडवून मराठी राज्याची स्थापना करणारे छत्रपति शिवाजी राजे यांचें नांव तुम्हांस ठाऊक असेलच. तसेंच त्यांनीं निरनिराळीं साहसाचीं व अचाट कामें करून केवढी कीर्ति मिळविली हेंही तुम्हांस माहीत असेलच. यास्तव शिवाजीराजांसंबंधीं कांहीं विशेष हकीकत न सांगतां त्यांचे वडील चिरंजीव संभाजी महाराज यांचें अल्पसें चरित्र तुमच्या माहितीसाठीं खालीं देतों.

शिवाजी राजे यांस पुष्कळ स्त्रिया होत्या. त्यांपैकीं सर्वांत मोठी ही निंबाळकरांची कन्या होय. तिचें नांव सईबाई असें होतें. शिवाजी राजांस जरी दुसऱ्या स्त्रिया होत्या, तरी सईबाईवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें व तिच्या-

विषयीं राजांच्या मनांत फार आदर असे. तीही त्या प्रेमास व आदरास पात्र होती. या सईबाईच्या पोटीं ज्येष्ठ शु. १२ शके १५७९ म्हणजे इ. स. १६५७ च्या जून महिन्यांत संभाजी महाराजांचा जन्म झाला. महाराजांस मातृसुख फार दिवस लाधलें नाहीं. कारण, सईबाई या इ. स. १६५९ म्हणजे महाराज अवघे दोन वर्षांचे असतांनाच वारल्या.

संभाजी महाराजांशिवाय शिवाजी राजे यांस सोयराबाई नांवाच्या स्त्रीपासून राजाराम महाराज या नांवाचा आणखी एक पुत्र होता. आपण स्थापन केलेल्या राज्याची दिवसेंदिवस वाढ करून त्याचा नीट रीतीनें सांभाळ करतां यावा यासाठीं शिवाजी राजांनीं दोघांहि राजपुत्रांस उत्तम शिक्षण देण्याचा प्रयत्न केला. त्यांस लिहिणें वाचणें थोडें-बहुत शिकवून, घोड्यावर बसणें, तिरंदाजी, तालीम, शस्त्र-विद्या वगैरे गोष्टी उत्तम तऱ्हेनें शिकविल्या. त्यांस चांगल्या लोकांची संगत लागावी व नीच, दुराचारी लोकांचा संपर्कही लागूं नये म्हणून त्यांचे जवळ नेहमीं उत्तम व वृद्ध नोकर

लोक ठेविले होते. वाईट लोकांची संगत धरल्यानें पुराणां-तील रावण, दुर्योधन वगैरे राजांचा ज्याप्रमाणें समूळ नाश झाला, त्याचप्रमाणें आपलाही व्हावयाचा हें निरनिराळीं उदाहरणें सांगून त्यांच्या मनावर बिंबविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. राज्यकारभाराची त्यांस थोडी थोडी माहिती व्हावी म्हणून शिवाजी राजे त्यांस आपले बरोबर दरबारांत घेऊन बसत असत. त्यांस रामदासस्वामींचे दर्शनास व त्यांच-कडे राहण्यासही वरचेवर पाठवीत असत.

शिवाजी राजांच्या वरील सुशिक्षणाचा परिणाम संभाजी महाराजांच्या बाबतींत कांहींच झाला नाहीं. ते स्वभावतःच क्रूर व होते. शिवाय त्यांच्या मातुश्री लहानपणींच वारल्यामुळें आईकडून मिळणाऱ्या शिक्षणाचा जो कांहीं चांगला परिणाम मुलाच्या मनावर व्हावयाचा, तो संभाजी महाराजांच्या मनावर मुळींच झाला नाहीं. यामुळें ते हळुहळू स्वच्छंदी होऊन वयांत आल्यावर आपल्या वडिलांच्या फारसे कह्यांत राहीनातसे झाले.

संभाजी महाराजांच्या ल्हानपणाचा इतिहास उपलब्ध नाहीं. यामुळें ते गादीवर बसण्यापूर्वींच्या आयुष्यांतील गोष्टी फारशा कोणास माहीत नाहींत. एवढें मात्र खरें कीं, ल्हानपणासून ते शूर व धाडसी होते चवताळलेल्या वाघाच्या अंगावर ते एकटेच धांवून जात, असें सांगतात. अशाप्रकारच्या कित्येक धाडसांच्या प्रसंगीं ते स्वतःवर प्राणसंकटेंही आणीत व अशा वेळीं त्यांचा नांवाजलेला अत्यंत विश्वासू सेवक जोत्याजी केसरकर हा त्यांस त्या संकटांतून सोडवी असें सांगतात. असो

इ. स. १६६६ त शिवाजी राजे यांनीं मोंगलांशीं तह केला व या तहाच्या वेळीं औरंगजेब बादशहानें संभाजी महाराज, जे त्यावेळेस अवघे नऊ वर्षें वयाचे होते, त्यांस पांच हजार स्वारांचें मनसबदारी देण्याचें कबूल केलें होतें. या तहानंतर लवकरच शिवाजी राजे औरंगजेबानें बोलाविल्यावरून त्यास भेटण्यास दिल्लीस गेले. जातेवेळीं त्यांनीं संभाजी महाराजांस बरोबर नेलें होतें. औरंगजेबानें शिवाजी राजांशीं कपट करून त्यांस कबूल केल्याप्रमाणें त्यांचा योग्य

मानमरातब न ठेवितां त्यांस संभाजी महाराजांसह नजर केंदेत ठेविलें. औरंगजेबाचें कपट लक्षांत येतांच शिवाजी राजांनीं निरानिराळीं निमित्तें सांगून आपल्याबरोबर नेलेल्या लोकांची दिल्लींतून कशी सुटका केली व त्यानंतर स्वतः अतिशय आजारी पडल्याचें मिष करून त्या आजारांतून बरे झाल्याबद्दलच्या आनंदाप्रीत्यर्थ तेथील अमीरउमरावांस पेटाऱ्यांतून मेवामिठाई पाठविण्याचा परिपाठ पाडून एके दिवशीं एका पेटाऱ्यांत स्वतः व दुसऱ्यांत संभाजी महाराजांस बसवून औरंगजेब बादशहाच्या हातावर मोठ्या अलौकिक युक्तीनें तुरी देऊन संभाजी महाराजांसह शिवाजी राजांनीं दिल्लींतून प्रयाण कसें केलें, ही मनोरंजक हकीकत सर्वांस माहीत असेलच.

दिल्ली शहराच्या बाहेर पडतांच पूर्वी व्यवस्था केल्या प्रमाणें तयार असलेल्या घोड्यांवर स्वार होऊन शिवाजी राजांनीं संभाजी महाराजांसह अतिशय जलद पळ काढून मथुरा गाठली. मथुरेस गोसावी, बैरागी वगैरे लोकांचा भरणा बराच असल्यानें शिवाजीराजे यांनीं तेथेंच स्वतः

बैराग्याचा वेष धारण केला व संभाजी महाराजांसही तो वेष दिला. मथुरेस शिवाजी राजांचे पेशवे मोरोपंत पिंगळे यांचे मेहुणे, तिघे बंधु रहात असत. त्यांनीं या बैराग्यांस पुढें पळून जाण्याचें सोईवार होईपर्यंत स्वतःच्या घरीं ठेवून घेतलें.

इतक्या गोष्टी होईपर्यंत शिवाजी राजांच्या पलाययनाची हकीकत औरंगजेबाच्या कानीं गेली. त्या हकीगतीनें त्यास अत्यंत त्वेष येऊन शिवाजी राजांचा तपास करून त्यांस पकडून आणण्यास गांवोगांवच्या अधिकाऱ्यांस त्यानें तांतडीचे हुकूम तत्काळ सोडले परंतु कोठेंही त्यांचा पत्ता लागाण्याचा संभव त्यांस न दिसल्यानें मथुरेच्या बैरागी गोसावी वर्गांतच त्यांचा कसून तपास करावा, असा मथुरेच्या अधिकाऱ्यांस हुकूम झाला.

वरील हुकूम होण्याचे संधीसच शिवाजीराजे मथुरेंत पकडले जाण्याच्या अगदीं बेतात होते. एका प्रसंगीं यमुना नदीचे कांठीं बसून दक्षिणेंत जावयाच्या रस्त्यांविषयीं व जाण्यास लागणाऱ्या खर्चाविषयीं शिवाजीराजे आपल्या-

बरोबरच्या मंडळीशीं वाटाघाट करीत होते. हें त्यांचें संभाषण जवळच असलेल्या एका ब्राह्मणाच्या कानीं पडतांच, मंडळीच्या पेहेरावास अनुसरून नसलेलें तें संभाषण ध्यानांत येऊन त्यानें मंडळीस त्याबद्दल प्रश्न केला. सुदैवानें जवळच एक कृष्णाजी विश्वनाथ नांवाचा ब्राह्मण होता. या ब्राह्मणास मोरोपंत पिंगळ्यांच्या त्रिवर्गबंधूंनीं पूर्वीच आपलासा करून घेतलेला असल्यानें त्यानें त्या प्रश्न करणाऱ्या ब्राह्मणाची समजूत करून देऊन त्यास गप्प केलें व मागाहून त्यास बक्षिस वगैरे देववून त्यास शिवाजीराजांचा एक भक्त बनवून सोडलें.

हा प्रसंग येऊन गेल्यावर व वर सांगितलेला औरंगजेबाचा हुकुम समजल्यावर यापुढें मथुरेंत रहाणें फार धोक्याचें आहे हें शिवाजीराजांच्या लक्षांत आलें. परंतु संभाजी महाराज फार लहान असल्यानें त्यांस प्रवासाची दगदग सोसवणार नाहीं व ते बरोबर असल्यानें दोघेहि पकडले जाण्याची भीति असल्यानें त्यांस तेथेंच कृष्णाजी विश्वनाथाच्या आईकडे ठेवून स्वतः कृष्णाजीस रस्ता दाख-

विण्यासाठीं बरोबर घेऊन शिवाजीराजे मार्गस्थ झाले, व पूर्वसंकल्पाप्रमाणें काशी, प्रयाग वगैरे तीर्थें पहात पहात सर्व तीर्थयात्रा निर्विघ्नपणें करून दक्षिण सोडल्यापासून नऊ महिन्यांनीं परत रायगडास दाखल झाले. शिवाजी राजे दिल्लीहून सुखरूपपणें परत आले म्हणून जिजाबाईनीं मोठा उत्सव केला. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. फक्त संभाजी महाराज अद्याप संकटांत होते, ही एकच गोष्ट शिवाजीराजे व जिजाबाई या दोघांच्या मनास त्यावेळीं दुःख देणारी होती.

शिवाजी राजांस दक्षिणेंत सुरक्षितपणें पोंचवून कृष्णाजी विश्वनाथ परत मथुरेस गेला. स्वतःची आई, काशीजी त्रिमल नांवाचा मोरोपंत पिंगळ्यांचा एक मेहुणा व संभाजी महाराज यांस बरोबर घेऊन तो परत पुण्याच्या मार्गास लागला. उज्जनीपर्यंत या मंडळीचा प्रवास निर्विघ्नपणें पार पडला. उज्जनीस या सुंदर व उच्च स्थितींतील मुलास पाहून हे संभाजी महाराज असावेत अशी एका मुसलमान अंमलदारास शंका आली व त्याप्रमाणें त्यानें या

मंडळीस प्रश्न केला. या प्रश्नानें काशीजीनें बिलकुल न डगमगतां शांतपणें त्यास उत्तर केलें कीं, हा मुलगा माझा आहे. माझी बायको, आई, मुलगा व मी असे चौघेजण थोड्या दिवसांपूर्वीं प्रयागच्या यात्रेस जाण्याकरतां निघालों परंतु दुर्दैवानें माझी आई रस्त्यांतच मरण पावली व माझी बायको प्रयाग येथें आजारी होऊन मरण पावली. आतां मी माझ्या या पोरक्या मुलास पुन्हा माझ्या गांवीं घेऊन जात आहें." काशीजीच्या शांतपणानें त्या मुसलमान अंमलदारास उगीच एखाद्या मनुष्याबद्दल भलताच संशय घेतल्याबद्दल आधींच वाईट वाटत होतें, त्यांत त्याच्यावरील सयुक्तिक उत्तरानें त्यांत भर टाकिली. तरीपण तसें कांहीं चर्येवर दिसूं न देतां तो मुसलमान म्हणाला, "असें असेल तर तुला तुझ्या मुलासह एका ताटांत जेवावयास हरकत असतां नये. तरी त्याप्रमाणें मला तसें जेऊन दाखव." आतां हिंदुधर्मशास्त्राच्या परंपरेप्रमाणें ब्राम्हणानें मराठ्याबरोबर एका ताटांत जेवणें रूढीविरुद्ध असतांही काशीजी मुळींच न डगमगतां संभाजी महाराजांबरोबर

एका ताटांत जेवला. तें पाहून तो मुसलमान अंमलदार खूष झाला व त्यांस कांहीं एक प्रश्न न करितां सखेदाश्चर्य करीत चालता झाला.

वरील प्रसंगांतून ईश्वरकृपेनें सुखरूपपणें सुटल्यानंतर, आमची प्रवासी मंडळी गोदावरी नदीचे कांठावरील राक्षसभवन नांवाच्या गांवापर्यंत पायींच चालत गेली व तेथें भाड्यानें घोडे ठरवून शक्य तितक्या त्वरेनें प्रवास करून त्यांनी लवकरच रायगड गांठला.

संभाजी महाराज सुरक्षितपणें दक्षिणेंत येऊन आपणांस भेटल्याबद्दल शिवाजीराजांस अतिशय आनंद झाला. त्यांनीं मोरोपंत पिंगळे यांच्या तिघाही मेहुण्यांस विश्वासराव असा किताब दिला. शिवाय काशीजी व कृष्णाजी विश्वनाथ यांची आई या दोघांस प्रत्येकीं पंचवीस हजार रुपये बक्षीस दिले. असो. अशा प्रकारें संभाजी महाराजांबद्दलच्या काळजींतून मुक्त होतांच शिवाजीराजांस मोंगलांचा सूड घेण्यास मोकळीक झाली.

मागें सांगितलेंच आहे कीं, संभाजी महारजांस सुशि-

क्षण देण्याचा शिवाजीराजांनीं बराच प्रयत्न केला. परंतु त्यांत त्यांस यश आलें नाहीं. महाराज अत्यंत दुराचारी व क्रूर वृत्तीचे झाले. एके समयीं, म्हणजे शिवाजीराजांनीं स्वतःस राज्याभिषेक करून घेतल्यानंतर, राजवाड्यांत हळदी-कुंकवाचा समारंभ होता. त्यावेळीं संभाजी महाराजांनीं एका ब्राह्मणाच्या स्त्रीवर बलात्कार केला. ही हकीगत ऐकून शिवाजी राजांस फार वाईट वाटलें. परस्त्रीबद्दल शिवाजी राजांच्या मनांत किती आदरभाव वसत असे तें त्यांस एके काळीं त्यांच्या सरदारांनीं पळवून आणलेल्या एका सुस्वरूप मुसलमान स्त्रीस नजर केलें त्यावेळच्या त्यांच्या उद्गारांबद्दलच्या हकीकतीवरून तुम्हांस माहीत असेलच. मुसलमान स्त्रीबद्दल ज्यांचे मनांत इतका पूज्यभाव त्या शिवाजी राजांस ब्राह्मण स्त्रीवरील बलात्काराची हकीगत ऐकून काय वाटलें असेल याची कल्पना तुम्हांस सहज होईल. ते अत्यंत तिरस्कारानें बोलले, "हे आमचे पुत्र ! ! पूर्वजन्मीं कोणतें पापाचरण केलें म्हणून हे आमचेच पोटीं जन्मास आले ! आमचे मागें हे सर्व राज्याचे अधिकारी होणार !

प्रजा हीं राजाचीं अपत्यें आणि यांची तर ही राक्षसी वाग-णूक ! पुत्र झाला म्हणून काय झालें ? शिक्षाच करीन ". वडिलांचे वरील उद्गार ऐकून संभाजी महाराजांस एक प्रकारें भीति वाटली वडिलांचा स्वभाव त्यांस माहित होता. ते बोलल्याप्रमाणें शिक्षा केल्याशिवाय कधींही रहावयाचे नाहींत अशी संभाजी महाराजांस दहशत बसून त्या दिवसापासून ते उदासपणें वागू लागले.

वरील प्रसंगाचे सुमारास, औरंगजेबानें दक्षिणेंतील विजापूर व गोवळकोंड्याचीं राज्यें मिळविण्यासाठी तसेंच शिवाजीराजांचें पारिपत्य करण्यासाठीं ज्या दिलेरखान नामक सरदाराची नेमणूक केली होती त्या सरदारानें विजा-पूरकरांस फार सतावून सोडल्यामुळें त्यांचा प्रतिनिधी मसाउदखान यानें शिवाजीराजांस स्वतःच्या मदतीस येण्याविषयीं पाचारण केलें व त्याप्रमाणें ते लष्करानिशीं तिकडे जावयास निघाले असतां वाटेंतच त्यांस एक अनिष्ट बातमी केळल्यामुळें त्यांनीं आपले सेनापति हंबीरराव मोहिते यांस विजापूरकरांच्या मदतीस पाठवून आपण

स्वतःवर आलेल्या संकटाचें निवारण करण्यासाठीं पन्हाळ्यास आले.

वर लिहिल्याप्रमाणें वडिलांच्या भीतीमुळें संभाजी महाराजांची उदासवृत्ति पाहून त्यांचे बालमित्र उमाजीपंत– जे समवयी असून समंजस गणले जात असत, त्यांनीं महाराजांस एकांतीं गांठून सांगितलें कीं, " आपण काळजी करूं नये. दिलेरखान जवळ आमचे हितसंबंधीं लोक आहेत. आपली मर्जी असल्यास आपण तिकडे चलावें म्हणजे बंदोबस्त करून देईन." हें भाषण ऐकून महाराजांस आनंद झाला. कांहीं दिवसांनीं त्यांनीं उमाजीपंतास दिलेरखानाकडे पाठवून त्याच्याशीं सल्लामसलत केली व एके दिवशीं कांहीं बहाणा करुन स्वतःची बायको येसुबाई यांस बरोबर घेऊन ते दिलेरखानास भेटले. शिवाजीराजांस विजापुरास जातेवेळीं रस्त्यांत जी अनिष्ट बातमी कळली असें वर म्हटलें आहे ती हीच संभाजी महाराजांच्या फितुरीबद्दलची होय.

संभाजी महाराज दिलेरखानच्या लष्करापाशीं येतांच खान त्यांस सामोरा जाऊन मोठ्या समारंभानें भेटला. खानास शिवाजीराजांविषयीं माहिती होतीच व त्यामुळें संभाजी महाराज आपणांकडे फितुर होऊन आले असतील या गोष्टीवर त्याचा एकदम विश्वास बसेना. त्यास वाटे कीं, शिवाजीराजांनींच त्यांस दुसऱ्या कांहींतरी अंतःस्थ हेतूनें पाठविलें असावें. परंतु शेवटीं त्यानें संभाजी महाराजांस खोदखोदून प्रश्न विचारून त्यांचा त्यांच्याकडे येण्याचा आशय जाणून घेतला. शिवाजी राजांचा पुत्र त्यांच्यावर रागावून आपणाकडे आला हें समजून खानास फार आनंद झाला. त्यानें ही आनंदाची बातमी औरंगजेबास त्वरेनें कळविली. औरंगजेबानें संभाजी महाराजांस ७००० घोडेस्वारांची मनसब दिली व एक हत्ती नजर केला. दिलेरखानानेंही त्यांस मौल्यवान् वस्त्रें वगैरे देऊन त्यांचा योग्य सत्कार केला.

मराठे लोक सध्यां फार बळावले आहेत व म्हणून त्यांच्यांत फूट पाडण्यास संभाजी महाराज हे आपले हातीं

आयतेच चांगलें साधन आहे यासाठीं त्यांस राजा ही पदवी देऊन एका पक्षाचें मुख्य केल्यास व त्यांस आगग मदत केल्यास त्यांचे मार्फत मराठ्यांचे एका मागून एक सर्व किल्ले सहज सर करतां येतील वगैरे आपलें मत दिलेर-खानानें औरंगजेबास कळविलें. औरंगजेबाच्या कारस्थानी स्वभावावरून आपल्या ह्मणण्यास तो सहज रुकार देईल अशी खानाची पक्की खात्री असल्यामुळें औरंगजेबाकडून उत्तर येण्याची वाट न पाहतां त्यानें संभाजी महाराजांस 'राजा' हा किताब देऊन त्यांच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांस भूपाळगड घेण्यासाठीं रवाना केलें.

भूपाळगडचा किल्लेदार या वेळीं फिरंगोजी नरसाळा हा होता. या फिरंगोजीनेंच इ. स. १६१४ त चाकण किल्ला शाहिस्तेखानाबरोबर लढविला होता. किल्ल्यास मोर्चे लावून संभाजी महाराज स्वतः किल्ल्यासमोर उभे राहिले. फिरंगोजीची पंचाईत झाली. वरून गोळा टाकावा तर शिवाजीराजांचे पुत्र समोर उभे. न टाकावा तर काय करावें अशा विचारांत तो पडला. शेवटीं त्यानें मधला मार्ग स्वीका-

रण्याचें ठरवून आपल्या पदरचा एक मनुष्य पाठवून संभाजी महाराजांस विनंति केली की किल्ला घेऊं नये. महाराजांस या विनंतीचा राग येऊन त्यांनीं त्या आलेल्या मनुष्यास तत्काळ मारून टाकिलें व " बऱ्या बोलानें किल्ला आमचे स्वाधीन करा नाहीं तर सर्वांचा शिरच्छेद करीन " असा धमकीचा निरोप फिरंगोजीस पाठविला. त्यावरून फिरंगोजी व किल्ल्यावरील इतर मंडळी यांनीं किल्ला सोडून जाणें बरें असा विचार केला व शिवाजी राजांच्या कानीं सर्व हकीगत घालण्यासाठीं त्यांनीं रातोरात पळ काढला. जे थोडे लोक किल्ला धरून राहिले होते त्यांस संभाजी महाराजांनीं पकडून आणून कोणाचे हात, कोणाचे पाय असे तोडून व अशा रीतीनें किल्ला हस्तगत करून घेऊन महाराज दिलेरखानाच्या छावणीकडे परतले.

मागें सांगितल्याप्रमाणें आपणावर आलेलें संकट निवारण करण्यासाठीं शिवाजीराजे पन्हाळ्यास आल्यानंतर, त्यांनीं पुत्राची समजूत पाडण्यासाठीं संभाजी महाराजांकडे कांहीं चतुर माणसें पाठविलीं. त्यांनीं त्यांजबरोबर

त्यांस असा निरोप पाठविला कीं, " आज जन्मभर इतकी खटपट करून आम्हीं जें राज्य संपादन केलें तें केवळ तुम्हांसाठींच नव्हे काय? आमचें वय दिवसेंदिवस उतार होत चाललें आहे, तेव्हां आमची इच्छा आहे कीं, तुम्ही सर्व राज्यकारभार संभाळून असावें. तें न करितां तुम्ही यवनास मिळून आपलें राज्य पुन्हा त्यांचेच घरांत घालतां याला काय म्हणावें? आमचें आतां काय? दहा गेले आणि पांच उरले! आम्ही कोठें तरी पुण्यक्षेत्रीं जाऊन सुद्धां वास करण्यास राजी आहोंत. परंतु तुम्ही आपलेच हातानें आपलेंच नुकसान करून घेत आहां, हें तुम्हांस कसें समजत नाहीं? मागील गोष्टी झाल्या त्या झाल्या. यापुढें तरी तुम्हीं मोंगलांचे नादीं न लागतां माघारें आपले मुलखांत या. पाहिजे तेथें तुमचे खाजगी खर्चास तालुका लावून देतों." याप्रमाणें कांहीं ममतेच्या व कांहीं समजुतीच्या गोष्टी पुत्रास शिवाजी राजांनीं सांगून पाठविल्या.

इकडे दिलेरखानानें संभाजी महाराजांस 'राजा' ही पदवी देण्याविषयीं वगैरे औरंगजेबाकडे जी शिफारस केली

होती ती त्यास पहिल्यानें बरी वाटली; परंतु त्यास ती मागाहून अगदीं नापसंत पडली. कारण त्यास वाटलें संभाजी महाराज यांनीं सत्ता हातीं येतांच मदत करण्याचें सोडून देऊन मोंगलांच्या हिंदू सरदारांस फितविल्यास आपण आयतीच मराठ्यांस मदत केल्यासारखें होईल. ह्मणून त्यानें संभाजी महाराजांस कैद करून त्यांस दिल्लीस रवाना करण्याचा दिलेरखानास हुकुम केला. दिलेरखानास बादशहाचा हा हुकुम आवडला नाहीं. तसेंच संभाजी महाराजांस त्यानें अभयवचन दिलें असल्यामुळें आतां त्यांचा विश्वासघात करणें त्यास बरोबर वाटलें नाहीं. यासाठीं त्यानें बादशहाचा हुकूम संभाजी महाराजांचे कानीं घातला व त्यांस मोंगलांची छावणी सोडून जाण्यांत मदत केली. आपण हातची शिकार मुद्दाम सोडली अशी कोणास शंका येऊं नये ह्मणून खानानें संभाजी महाराजांचा उघडपणें अपमान करून त्यांची मनसब कमी केली व त्यांच्या असामीची रकमही दिली नाहीं. महाराजांनींही आपला असा अपमान झाल्याबद्दल आपणास फार वाईट वाटलें आहे असें दर्शविलें. याच संधीस वर लिहिल्याप्रमाणें संभाजी महा-

राजांची समजूत पाडण्यासाठीं शिवाजी राजांनीं पाठविलेलीं माणसें खानाच्या छावणीकडे येऊन पोंचलीं होतीं. या सुसंधीचा फायदा घेऊन खानानें महाराजांची त्या माणसांशीं भेट करवून देऊन त्यांजबरोबर त्यांची रवानगी करून दिली. संभाजी महाराजांनींही असा विचार केला कीं, 'दिल्लीपतीचे राज्यांत जो आपला निभाव लागला नाहीं तो विजापूर वगैरे ठिकाणीं कसा लागेल ? शिवाय वडिलांकडू-नही सामोपचारानें बोलावणें आलें आहे, त्याअर्थीं आतां जास्त न भटकतां परत आपल्या मुलखांत जावें हें बरें.' असा विचार करून येसूबाईस बरोबर घेऊन शिवाजी राजांनीं पाठविलेल्या माणसांबरोबर निघून संभाजी महाराज पन्हाळ्यास—जेथें वडील होते तेथें पोंचले. शिवाजीराजांस या गोष्टीनें आनंद होऊन ते पुत्रास समारंभानें सामोरे जाऊन भेटले. नंतर यापुढें असा प्रसंग येऊं नये ह्मणून राजांनीं चिरंजीवास उपदेश करून त्याचा पूर्ण बंदोबस्त केला. खर्चवेंच पहाणें वगैरे व्यवस्था त्र्यंबकजी बाजी प्रभु यांस सांगितली, लोकांची बरदास्त हवालदारांनीं ठेवावी असें ठरविलें व संभाजी महाराजांनीं त्या दोघांच्या सल्ल्यानें

वागावें असें त्यांस सांगितलें. या प्रमाणें बंदोबस्त करून शिवाजी राजे आपले पुढील कार्यास गेले व इकडील बातमी आपणास वरचेवर मिळावी अशी त्यांनीं व्यवस्था केली. यापुढें शिवाजी राजांच्या मरणकालापर्यंत संभाजी महाराज पन्हाळ्यासच होते.

मुलांनों, तुह्मांस माहीत आहेच कीं, शिवाजी राजे हे इ. स. १६८० च्या एप्रिलच्या ५ व्या तारखेस गुडघीच्या रोगानें मरण पावले. मरण समयीं त्यांचें वय अवघें ५३ वर्षांचें, ह्मणजे त्या काळच्या मानानें फार नसल्यानें व शिवाय त्यांचें देहावसान केवळ सात दिवसांच्या अल्पावधींत झाल्यानें त्यांस आपल्या मागें राज्याची व्यवस्था कशी असावी त्याबद्दल विचार करून योग्य तजवीज करतां आली नाहीं. अगदीं ऐन वेळेस मात्र त्यांस स्वतःचा भरंवसा वाटूं लागला व त्यावेळीं त्यांनीं सभोंवतालच्या मंडळांकडे कांहीं दुःखोद्गार काढून त्यांस सुचविलें कीं, संभाजी महाराज जरी दुर्वृत्त असले तरी राजाराम महाराज वयानें फार लहान असल्यानें त्यांवर राज्यभार टाकतां येत

नाहीं; यासाठीं सर्वांनीं एकदिलानें वागून संभाजी महाराजांकरवीं उत्तम प्रकारें राज्यकारभार चालवून प्रजेस सुख होईल असें करावें, वगैरे अनेक गोष्टी सांगितल्या.

शिवाजीराजांची पत्नी सोयराबाई हिच्या मनांतून राजांच्या पश्चात् राज्याचा मालक आपला मुलगा राजाराम हा व्हावा, असें होतें. शिवाय राजांनीं अनेक वेळां व विशेषतः अंतसमयीं संभाजी महाराजांच्या दुराचरणाविषयीं उद्गार काढून त्यांच्या कारकीर्दींत राज्याची काय दशा होईल अशी काळजी दर्शविल्यानें ती गोष्ट सोयराबाईच्या पथ्यावरच पडली. राजांच्या उद्गारांचा फायदा घेऊन तिनें कांहीं प्रधानमंडळीशीं मसलत करून असें ठरविलें कीं, संभाजी महाराजांस शिवाजीराजांच्या मृत्यूची वार्ता इतक्यांत न कळवितां त्यांस पन्हाळ्यासच बंदोबस्तानें ठेवावें व राजाराम महाराजांच्या नांवें द्वाही फिरवून प्रधानमंडळानें राज्यकारभार चालवावा. येणेंप्रमाणें बेत ठरून त्याप्रमाणें ठिकठिकाणीं पत्रें लिहून पाठविलीं. त्यांतच एक पत्र संभाजी महाराजांवर देखरेख ठेवण्याबद्दलचें

हिरोजी फरजंद यास पाठविलें. खुद्द संभाजी महाराजांसही एक पत्र पाठविलें होतें; परंतु त्यांत शिवाजीराजांच्या मरणाची हकीगत न लिहितां फक्त राजे आजारी असल्याबद्दलच लिहिलें होतें.

संभाजी महाराजांस वडिलांच्या आजाराविषयीं हकीकत समजली तेव्हां त्यांस अतोनात वाईट वाटलें, व केव्हां एकदां वडिलांचें दर्शन घेईन असें त्यांस होऊन गेलें. अतिशय त्वरा करून व रात्रंदिवस उंटावरून प्रवास करून त्यांनीं रायगड गांठला. परंतु दुर्दैवानें त्यांस पित्याचें अंतकाळचें दर्शन घडलें नाहीं. कारण संभाजी महाराज रायगडच्या पायथ्याशीं येऊन पोंचण्यापूर्वींच शिवाजीराजांचें प्राणोत्क्रमण झालें होतें. अशा तऱ्हेनें निराश झाल्यानें व इतकी धांवपळ करून येऊन देखील वडिलांची भेट न होतां त्यांच्या मरणाची दुःखकारक बातमी समजतांच संभाजी महाराजांस अत्यंत त्वेष आला व त्याचा परिणाम असा झाला कीं, ज्या उंटावरून आपण प्रवास केला तें उत्तम गतीनें न चालल्यामुळेंच आपली व वडिलांची भेट झाली

नाहीं असें मनांत आणून संभाजी महाराजांनीं तरवारीच्या एका घावांतच उंटाचें शीर त्याच्या धडापासून वेगळें केलें. इतकें करूनही त्यांचा राग शांत झाला नाहीं. दुसऱ्या उंटांसही योग्य दहशत बसावी ह्मणून किल्याच्या बाहेरील दरवाजाजवळ शिराशिवायचें असें एक उंट तयार करून तेथें उभें करण्याबद्दल त्यांनीं तत्काळ हुकुम सोडला. संभाजी महाराजांच्या या बालिश मूर्खपणाचें जणूं काय स्मरणच असें तें उंट अद्याप तेथें आहे असें सांगतात.

वरील हकीगतीच्या सत्यतेविषयीं खात्री देतां येत नाहीं. कारण ती हकीगत एके ठिकाणींच सांपडते. दुसरे इतिहासकार वगैरे निराळीच हकीगत देतात, ती अशी:— संभाजी महाराज पन्हाळ्यास घोड्यावरून फिरत असतां मागें सांगितलेलीं पत्रें घेऊन जासूद त्या ठिकाणीं पोंचला. जासुदानें महाराजांचें पत्र त्यांस दिलें, परंतु त्याजकडे दुसरीं अनेक पत्रें पाहून त्यांस संशय येऊन त्यांनीं जासुदास दरडावून तीं पत्रें पहाण्यास मागितलीं. पत्रें पहातांच सर्व हकीगत महाराजांच्या लक्ष्यांत आली. आपल्या

साम्स्न गातोश्रीचें सर्व कारस्थान त्यांच्या ध्यानांत येतांच त्यांनीं पहिल्या प्रथम आपणावर देखरेख करणारे सोमाजी नाईक बंकी व सूर्याजी कंक यांस एकदम ठार मारलें. हा प्रकार पाहून हिरोजी फरजद तेथून पळून गेला व म्हणूनच तो वांचला. अशा प्रकारें तीन अंमलदारांची वासलात लागतांच महाराजांनीं पन्हाळा किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. किल्ल्याच्या पायथ्याशीं जनार्दनपंत सुमंत फौजेनिशीं होता. त्याच्या फौजेंत महाराजांनीं फितूरी आरंभिली व एके रात्रीं त्याच्या फौजेवर अचानक हल्ला करून त्यास कैद केलें व किल्ल्यावर आणिलें. ही हकीगत ऐकून व महाराजांचा पराक्रम पाहून अनुक्रमें मोरोपंत पेशवे व सेनापती हंबीरराव मोहिते त्यांस जाऊन मिळाले. याप्रमाणें महाराजांचा पक्ष बळावत जाऊन त्यांनीं रायगडावर स्वारी करण्याचें ठरवून ते सोयराबाईच्या पक्षांतील मंडळीचा ठिकठिकाणीं पाडाव करीत इ. स. १६८० च्या जून महिन्यांत विजयी असे रायगडास पोंचले.

संभाजी महाराजांनीं वरील प्रकारचा पराक्रम करून

दाखविल्यामुळें त्यांचेविषयीं पुष्कळ लोकांचे मनांत आदरभाव उत्पन्न झाला व पुष्कळांस असें वाटलें कीं, शिवाजी राजे जरी पुत्राविषयीं निराश झाले तरी पण पुत्राचे अंगीं पित्याचे धैर्यशौर्यादि गुण असल्यामुळें त्यांचेसंबंधीं निराश होण्याचें कारण नाहीं. परंतु लोकांचा हा भ्रम फार दिवस टिकला नाहीं. कारण शिवाजी राजे जितके दयाळु, त्याच्या उलट संभाजी महाराज तितकेच निर्दय असल्याचें लोकांच्या नजरेस आलें.

एखाद्या सत्ताधारी परंतु अविचारी व चिडखोर मनुष्याकडून कोणतीहि गोष्ट करून घ्यावयाची असल्यास जरा त्याच्याच कलानें घेतल्यास तो मनुष्य ती गोष्ट सुरळीतपणें करितो. पण जर त्या पूर्वी त्या मनुष्यास चिडविलें तर ती गोष्ट नीटपणें न होतां तो मनुष्य रागाच्या भरांत अविचारानें भलतीच गोष्ट करतो. असाच कांहींसा प्रकार संभाजी महाराजांच्या बाबतींत झाला. प्रथमतःच जर शिवाजी महाराजांच्या आजाराची माहिती संभाजी महाराजांस वेळींच दिली असती व त्यांस कैदेंत ठेवण्याचा घाट करून राजा-

राम महाराजांच्या नांवें राज्यकारभार चालविण्याची मसलत न करतां संभाजी महाराजांच्या कलानेंच जर सर्व गोष्टी घेतल्या असत्या तर पुढें त्यांच्या हातून जीं अत्यंत क्रूर कर्में घडलीं तीं मुळींच घडलीं नसतीं असें म्हाणावयास कांहीं हरकत नाहीं. रायगड किल्ला हस्तगत करून घेतल्यावर महाराजांनीं प्रथम अण्णाजी दत्तो यास कैद केलें व त्याची मालमत्ता जप्त केली. तसेंच राजाराम महाराज यांसही कैद केलें व सोयराबाईस कैद करवून आपणासमोर आणविली व " स्वतःच्या मुलास राज्य मिळावें म्हणून तूं महाराजांस (शिवाजीराजांस) विषप्रयोग करून ठार मारलेंस काय ?" असें विचारून व तिची आणखी अनेक प्रकारें निर्भर्त्सना करून तिला भिंतींत कोनाड्यांत बसवून चिणून टाकण्याचा हुकूम केला. तीन दिवसपर्यंत ती जिवंत होती. नंतर तिची क्रिया राजाराम महाराजांचे हस्तें करविली. सोमाजी नाईक बंकी याचे मुलास कड्यावरून खालीं लोटून दिलें. पंधरा माणसांवरांस एकदम ठार मारलें. याप्रमाणें एकंदर दोनशें लहान मोठ्या अंमलदारांस महाराजांनीं देहान्त शिक्षा

देण्याचें अत्यंत राक्षसी काम केलें. सोयराबाईचे आप्त शिरके सरदार सर्वजण महाराजांचे शत्रू बनले. तिचा पक्ष मोडून आपला हक्क प्रस्थापित करण्यांत महाराजांनीं पहिल्यानें जें शौर्य व धोरण दाखविलें होतें त्यामुळें लोकांचे मनांत त्यांचेविषयीं उद्भवलेला आदरभाव वर सांगितलेल्या त्यांच्या अमानुष कृत्यामुळें पार लयास जाऊन त्याचे ऐवजीं त्यांचे मनांत भीति व काळजी यांनीं ठाणें दिलें. असो.

याप्रमाणें विरुद्ध पक्षाचा चांगला सूड घेऊन झाल्यानंतर नागपंचमीच्या दिवशी महाराज राज्यारूढ झाले व इ. स. १६८१ च्या फेब्रुवारींत त्यांनीं स्वतःस यथाविधि राज्याभिषेक करवून घेतला. राज्याभिषेकाचे वेळीं पुष्कळ दुश्चिन्हें झालीं असें सांगतात प्रथम त्या दिवशीं ढगामुळें सूर्यदर्शनच झालें नाहीं. सिंहासनारूढ झाल्यावर महाराज रथावर बसून काळपुरुष मारण्याचा विधि करावयास चालले असतां वाटेंत रथच मोडला. असो चालीप्रमाणें यज्ञ, ब्राह्मणभोजनें, दक्षणा वगैरे सर्व झालें. महाराजांनीं पूर्वीचेच प्रधान तूर्त राहूं दिले, परंतु त्यांचे हातून कामें न घेतां

त्यांचे गुमास्ते, उद्धव पुंगदेव व बहिरोपंत, यांजकडून तें कामें घेऊं लागले.

राज्यारोहणानंतर लवकरच संभाजी महाराज परळी येथें रामदासस्वामींच्या दर्शनास गेले. स्वामींस महाराजांच्या अमानुषपणाची माहिती अगोदरच लागली होती. असल्या मनुष्याचें मुखावलोकन करणें म्हणजे महत्पाप होय असें वाटूनच कीं काय, स्वामींनीं महाराजांची भेट घेतली नाहीं व त्यांस दर्शनही दिलें नाहीं. मात्र त्यांनीं त्यांस उपदेशपर असें लांबलचक पत्र पाठविलें. हें पत्र दासबोधांत प्रसिद्ध आहे. महाराजांच्या मनावर या पत्राचा कांहींच परिणाम झाला नाहीं. यानंतर लवकरच रामदासस्वामी समाधिस्थ झाले. स्वामींचा अंत्यविधि परळीसच झाला. त्यांच्या देहाची रक्षा पहिल्यानें चाफळ येथें नेली व ती तेथून कांहीं दिवसांनीं संभाजी महाराजांनीं उत्तरेस नेवून गंगोदकांत टाकविली.

संभाजी महाराज कितीही दुष्ट असले तरी सज्जनांविषयीं त्यांचे मनांत किती आदरभाव असे हें वरील एकाच गोष्टीवरून सहज ध्यानीं येण्याजोगें आहे.

यानंतर महाराज कांहीं राजकारणासाठीं पन्हाळ्यास गेले असतां औरंगजेबाचा चवथा मुलगा सुलतान अकबर हा आपणाकडे आश्रय मागण्यासाठीं रायगडावर आला असल्याची हकीगत त्यांस समजली. अकबरावर बापाची अत्यंत मर्जी होती. इ. स. १६८० चे सुमारास ‘ जिझीया ’ नामक करावरून औरंगजेबाविरूद्ध रजपूत लोकांनीं जें बंड केलें तें मोडण्यासाठीं त्यानें इतर मुलांबरोबर अकबरासही पाठविलें होतें. परंतु रजपुतांचा मुख्य सरदार दुर्गादास यानें अकबराचें मन वळवून त्यास आपलासा करून घेतला. या फितुरीची बातमी औरंगजेबास कळतांच त्यानें मोठ्या युक्तीनें ही फितुरी मोडून अकबराच्या लोकांस परत आपणाकडे वळविलें. त्यामुळें आतां बादशहापुढें आपला निभाव लागावयाचा नाहीं असें जाणून तो संभाजी महाराजांच्या आश्रयास तेथून पळून आला.

आपण रायगडावर आल्याची खबर महाराजांस अकबरानें पत्रें वस्त्रें वगैरे देऊन एका वकिलास पाठवून कळविली. ही बातमी समजतांच महाराजांनीं आपला एक

कारभारी त्यास सामोरा पाठवून रायगडाजवळ धोंडसें ह्मणून गांव होतें तें त्याच्या उतारास नेमून दिलें व त्यास योग्य नेमणूक करून दिली. कांहीं कालानंतर याच धोंडसें गांवास अकबराच्या उताराचें स्मारक ह्मणून बादशहापूर असें नांव दिलें. असो.

इकडे महाराज पन्हाळ्यास बरेच दिवस राहिले, या गोष्टीचा फायदा घेऊन सोयराबाईच्या पक्षाचे अण्णाजी दत्तो यांनीं राजाराम महाराज यांचे तर्फे अकबराकडे बोलणें लाविलें. ही हकीगत कर्णोपकर्णी महाराजांस कळली. प्रथम त्यांस अकबराचाच संशय आला. परंतु त्यानें स्वतः होऊनच सर्व हकीगत महाराजांचे कानीं घालून त्यांची संशयनिवृत्ति केली. यानंतर त्या दोघांचें बरेंच सख्य झालें. या पुढें लवकरच औरंगजेबानें गोवळकोंड्याचें राज्य घेतलें व आतां विजापूरचें राज्य घेऊन मग मराठ्यांचाही समाचार घेण्याचा औरंगजेबाचा विचार आहे वगैरे हकीगती ऐकून अकबरानें महाराजांस सांगितलें कीं, आपण दोघेही मिळून मोठी फौज गोळा

करून औरंगजेबास सामोरें जावें. परंतु महाराजांनीं अकब-राच्या या मसलतीकडे दुर्लक्ष्य केलें. यावरून अकबराची खात्री झाली कीं, महाराजांचा आपणास कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं, व तिकडे तर आपण बापाचा द्वेष संपादन केला. अतां आपला निभाव लागणें कठीण असें जाणून त्यानें संभाजी महाराजांस सांगितलें, कीं " आह्मांस सुरतेस जावयाचें. तेथून मक्केस जाऊं. याजकरितां आह्मांस सुरतेपर्यंत पोंचवावें. " त्यावरून महाराजांनीं त्यास निरोप देऊन त्याजबरोबर योग्य माणसें देऊन त्याची सुरतेस रवानगी केली. तेथून तो मक्केस निघून गेला.

महाराजांनीं आपल्या राज्यकारभाराच्या सुरवातीस जरी अत्यंत क्रूरपणें शिवाजी राजांच्या वेळच्या जुन्या व विश्वासू सरदारांस मारून टाकिलें, तरी पण ते वडिलां प्रमाणेंच शूर असल्यानें त्यांचें नांव राखतील अशी बरीच आशा होती. परंतु ही आशा समूळ नष्ट करण्यास जीं अनेक कारणें झालीं त्यांपैकीं मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे महाराजांचा मुख्य प्रधान कलुषा कबजी हा होय, हें मुलांनों तुह्मांस देखील माहीत असेल.

कबजी हा कनोजा ब्राह्मण होता. तो विद्वान् असून शाक्तपंथी होता. त्यास पुष्कळ मंत्रविद्या येत होत्या. त्यानें महाराजांवर कांहीं प्रयोग केला कीं काय समजत नाहीं. परंतु एवढें मात्र खरें कीं, महाराज त्यास चांगलेच वश झाले. इतके कीं तो सांगेल ती पूर्वदिशा अशी स्थिति झाली. शाक्तमार्गें अनुष्ठानें करून प्रयोग केल्यास त्या योगानें धनधान्यसमृद्धि होऊन राज्यवृद्धिही होते व दरेक गोष्टींत यश येतें इत्यादि महाराजांचे मनांत भरवून कलुषानें त्यांजकडून अनुष्ठानें करविलीं. पुढें पुढें त्यानें त्यांचे बुद्धीस भ्रंश पडेल असें करविलें. रेडे मारून त्यांच्या ओल्या कातड्यावर बसून त्यांचेकडून अनुष्ठानें करविलीं. तसेंच त्यांजकडून मद्यमांसादि खावबून पुष्कळ पशुवत्र करविले. कलुषाच्या या सर्व कृत्यांत महाराजांचें मन पूर्ण रमलें. जर कोणी हें करणें योग्य नव्हे असें महाराजांस सांगण्याचा धीर केला तर कलुषाच्या सांगण्यावरून महाराज त्यासच दरबारांत येण्याची बंदी करीत व कैदही करीत. इतक्या थरावर गोष्टी गेल्यानंतर महाराज जें करतील तें मुकाट्यानें पहाणें व सहन करणें याखेरीज कोणाचा कांहींच इलाज उरला नव्हता.

कलुषा हा औरंजेबाकडून संभाजी महाराजांस भ्रष्ट करण्याकरतां विडा उचलून आला होता, असें सांगतात. कित्येक भाविक लोकांची अशी समजूत होती कीं, तो कलीचा अवतार असून शिवाजीराजांनीं सुरू केलेल्या राज्य व धर्मसंस्थापनेचें उच्छेदन करण्याकरतां तो प्रकट झाला होता. एके ठिकाणीं असा आधार सांपडतो कीं, संभाजी महाराज वडिलांबरोबर दिल्लीस जाऊन परत येते वेळीं मथुरेस राहिले होते, असें तुम्ही वर वाचलेंच. त्यावेळीं मथुरेसच महाराजांची व कलुषाची चांगली ओळख झाली होती व त्या ओळखीचा फायदा घेण्यासाठींच महाराज राज्यारूढ झाल्याची खबर लागतांच तो त्यांचे दरबारीं आला होता. असो.

महाराजांस दारूचें व्यसन लागण्यास कलुषाच कारण झाला असें म्हटल्यास हरकत नाहीं. कारण तो त्यांजकडे येण्यापूर्वीं त्यांस हें व्यसन असल्याचा उल्लेख कोठें सांपडत नाहीं. असो.

महाराज पन्हाळ्यास असतांना अण्णाजी दत्तो वगैरे

मंडळींनीं फितुरी करण्याचा घाट घातला होता हें वर सांगितलेंच आहे. या फितुरीमध्यें शिवाजी महाराजांच्या वेळचा त्यांचा विश्वासू चिटणीस बाळाजी आवजी हा प्रमुख होता असा त्याजवर आरोप होता. शिवाय या कटांत सर्व शिरके मंडळीही सामील होती. बाळाजी आवजी व दादजी रघुनाथ देशपांडे यांचा पूर्वीपासूनच द्वेष होता त्याबद्दल सूड उगविण्यास दादजी रघुनाथ हा महाराजांच्या मर्जीतला असल्यामुळें त्यासही चांगलीच संधी मिळाली. महाराजांस पन्हाळ्यास कैदेंतच अडकवून ठेविण्याविषयीं वगैरे मागें जीं पत्रें लिहिलीं होतीं तीं चिटणिसांनीं आपल्या मुलाकडून लिहविलीं होतीं वगैरे हकीगत महाराजांस सांगून त्यानें त्यांचेविषयीं त्यांच्या मनांत द्वेष आणिला. आधींच महाराजांची क्रूर वृत्ती, त्यांत असा द्वेष चढलेला. मग काय विचारावयाचें ? तावडतोब महाराजांनीं चिटणिसांस बोलावून आणून त्यांस त्याच्या कृत्याचा जाब विचारला, व त्या कृत्याबद्दल त्याच्या मुलास देहान्त शिक्षा देण्याची धमकी दिली. चिटणिसांनीं आधीं आपणास मारावें व मग

पुत्रास काय करणें तें करावें असें सांगितलें. त्यावर हट्ट धरल्यास दोघांसही मरावें लागेल असें महाराजांनीं ह्मटलें. महाराजांचा हा हुकुमच समजून बाळाजी आवजी चिटणीस, त्यांचा भाऊ शामजी आवजी व वडील मुलगा आवजी बल्लाळ या तिघांसही हत्तीखालीं घालून मारण्यांत आलें. नंतर अण्णाजी दत्तो व शिरके कुळांतील जेवढी मंडळी हातीं लागली त्यांस व बहिरोजी फरजंद यांसही महाराजांनीं जिवें मारिलें.

मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो पंतसचीव यांची पहिल्यापासूनच चुरस होती. तरी पण आपल्या प्रतिस्पर्ध्याचा अशा रीतीनें अंत झालेला समजून त्यास फार वाईट वाटलें. इतकेंच नव्हे तर " आपण पंतसचिवाचा वध केला हें फार वेडेपणाचें व अधर्माचें काम केलें, याचा परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं " असें त्यानें महाराजांस निर्भीडपणें सांगितलें. या नंतर कांहीं दिवसांनीं कलुषानें मोरोपंताविषयीं महाराजांच्या मनांत वाईट गोष्टी भरवून " जुना चाकर झाला ह्मणून काय झालें ? त्यानें

तोंडावर अमर्याद भाषण करणें बरोबर नव्हे" वगैरे ह्मणून त्यास कैदेंत टाकविलें व त्याचें काम त्याचा मुलगा निळकंठ मोरेश्वर यास सोंपविलें. परंतु तो नुसता नांवाचाच मुख्य प्रधान झाला. सर्व कारभार महाराज व कलुषा हेच पहात असत.

महाराजांच्या सुदैवानें त्यांस बायको फार उत्तम मिळाली होती. ती शहाणी असून समजूतदार होती. तिचें नांव येसुबाई असें होतें. ही पिलाजी शिरक्याची मुलगी. महाराजांचें इच्याशीं इ. स. १६६७ च्या सुमारास लग्न झालें. महाराजांस तिच्यापासूनच इ. स. १६८० च्या डिसेंबरांत म्हणजे शके १६०२ मार्गशीर्ष शु. १० रोजीं शिवाजी नांवाचा मुलगा झाला. हाच मुलगा पुढें शाहू महाराज या नांवानें प्रसिद्ध झाला.

बाळाजी आवजी चिटणीस यांचा पुत्र व बंधुसह वध करण्याची महाराजांची इच्छा नव्हती. त्यांचा वध झाल्याची हकीगत समजतांच " त्यांस मारावयाचें कारण नव्हतें " असे उद्गार महाराजांचे तोंडून निघाले. या वधा-

नंतर महाराजांची पत्नीशीं गांठ पडतांच चिटणिसांसंबंधानें येसुबाई साहेब त्यांस म्हणाल्या, " बाळाजी आवजीस मारिलें हें योग्य केलें नाहीं. ते फार दिवसाचे जुने व पोक्त नोकर असून महाराजांच्या ( शिवाजी राजांच्या ) कृपा-दृष्टींतील होते. चिटणीस आपले व राज्याचे प्राण आहेत असें ते म्हणत असत. वंशपरंपरेनें त्यांस त्यांनीं चिटणिशी करून दिलेली हें आपणास माहीत असून, शिवाय त्यांचा अपराधही कांहीं नसतां, केवळ दुसऱ्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवून त्यांस एवढी घोर शिक्षा करावयाची नव्हती. अशीं उपयुक्त मनुष्यें एकामागून एक मारून टाकिलीं तर पुढें राज्य कसें चालावें?" इत्यादि बोलली. तेव्हां, " आमचेही मनांत ही गोष्ट नव्हती, परंतु रागाचे समयीं जें बोललों तीच परवानगी समजून त्यांचा वध करण्यांत आला. मागाहून चौकशी करतां त्यांचा वध अगोदरच होऊन गेला होता असें समजलें. गोष्ट वाईट झाली खरी, " असें तिला महाराजांनीं उत्तर दिलें. त्यानंतर येसुबाईनें चिटणिसांचे धाकटे दोघे मुलगे-खंडो बल्लाळ व निळो बल्लाळ--यांजकडे-

सच वडिलोपार्जीत चिटणिशी रहावी अशाबद्दल महाराजांचा हुकूम घेतला, व अशा तऱ्हेनें तिनें त्या लहान मुलांचें रक्षण करून त्यांची वंशपरंपरेची चिटणिशी त्यांस देवविली.

वरील गोष्टीनंतर ज्याप्रमाणें शिवाजी राजे शिक्के जिजाबाईकडे ठेवून करवीत असत, त्याप्रमाणेंच संभाजी महाराजांनींही शिक्के येसुबाईचे स्वाधीन करून कागद पत्रांवर तिचे समक्ष शिक्के व्हावे असें ठरविलें. त्यावरून येसुबाई ही खंडो बल्लाळ यांजकडून चिठ्ठीचपाटी लिहून घेई व स्वतः समक्ष शिक्के करवी.

शिवाजी राजाच्या वेळेपासून कर्नाटक प्रांतांत रघुनाथ नारायण हा मुख्य होता. शिवाजी राजांचा अंत होऊन त्यांच्या पश्चात् संभाजी महाराज गादीवर बसल्याचें ऐकून तो प्रांताचा बंदोबस्त हरजी राजे महाडीक यास सोंपवून व बरोबर बरेंचसें सैन्य व बरीच संपत्ति घेऊन नवीन महाराजांचे भेटीसाठीं ह्मणून कर्नाटक प्रांतांतून निघून रायडास येऊन दाखल झाला. आपल्या वडिलांच्या वेळचा अत्यंत विश्वासू व हुशार सरदार मोठी संपत्ती घेऊन आपल्या

भेटीस येत असल्याचें ऐकून महारजांनीं बिरवाडीस मोठा दरबार भरवून त्याची भेट घेतली व त्याचा मोठा मानसन्मान केला. रघुनाथपंतानेंही महाराजांस मेजवानी दिली व इतरांचाही बहुमान केला. असें करण्यांत त्याचा हेतू होता, तो हा कीं आपल्याबद्दल महाराजांच्या मनांत आदर उत्पन्न करावा ह्मणजे आपण त्यांस जो उपदेश करूं त्याचा त्यांच्या मनावर चांगला परिणाम व्हावा हा होय. त्यानें बेत केल्याप्रमाणें संधी साधून भरदरबारांत महाराजांस ह्मटलें, "दिवसेंदिवस आपलें राज्य वृद्धि न पावतां कमी कमीच होत चाललें आहे; चोहोंकडे पाळेगार बळावत चालले असून प्रजा हवालदील होत चालली आहे; प्रांत उजाड होत आहेत; महाराज ( शिवाजी राजे ) कैलासवासी होऊन पुरतीं दोन वर्षें सुद्धां झालीं नाहींत, इतक्यांतच असा प्रकार झाला याचें कारण काय? ब्राह्मण सरदार यांस किल्ल्यावर कैदेंत ठेवण्याचें सोडून त्यांचा शिरच्छेद करून ब्रह्महत्येचें पातक लावून घेतलें यास काय ह्मणावें? औरंगजेब बादशहा दक्षिणेंत येऊन स्वारी करतो, याबद्दल

काय विचार केला आहे?" अशा तऱ्हेचें रघुनाथपंतांचें निर्भीडपणाचें भाषण ऐकून महाराजांस त्याचा मनांतून राग तर आलाच. परंतु त्यास दुरुत्तरें देण्यास महाराजांस धीर होईना. त्यांनीं ती वेळ कशीतरी निभावून नेली, व आपला राग गिळला. मात्र त्यांनीं मोरोपंत पेशवे व जनार्दनपंत सुमंत यांस कैदेंतून सोडून पुन्हा कामावर घेतों असें कबूल केलें व त्याप्रमाणें मागाहून केलें.

रायगडास येण्यापूर्वीं रघुनाथपंतानें, औरंगजेब बादशहा दक्षिणेंत स्वारी करून विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें जिंकू पाहील तर महाराजांनीं दोन्ही राज्यांस मदत करून तिघांनीं मिळून औरंगजेबाचा समाचार घ्यावा अशी मसलत दोन्ही सुलतानाशीं त्यानें केली होती. परंतु ही मसलत महाराजांस पसंत नाहीं व त्यांचे जवळ कबजीचें व दुसऱ्या हलक्या माणसांचें प्राबल्य या गोष्टी जेव्हां त्यानें पाहिल्या तेव्हां अशा स्थितींत येथें रहाण्यांत आपली शोभा नाहीं असा त्यानें विचार केला व आपल्या पश्चात् जिंजी प्रांताची व्यवस्था बरोबर रहाणार नाहीं व मोंगल लोक

तिकडेही फौजा पाठवितील अशा तऱ्हेचीं कांहीं निमित्तें सांगून महाराजांची परवानगी घेऊन लौकरच त्यानें कर्नाटकाकडे प्रयाण केलें. परंतु तो तिकडे जाऊन पोंचण्यापूर्वी दुर्दैवानें रस्त्यांतच त्यास कांहीं दुखणें होऊन तो मरण पावला.

रघुनाथपंताच्या मरणानें मराठी राज्याचें फार नुकसान झालें. महाराजांचा जो अव्यवस्थित राज्यकारभार चालला होता त्यास--निदान पुढें जो अव्यवस्थितपणा जास्त वाढला त्यास--रघुनाथपंतामुळें खरोखरच कांहीं आळा बसला असता असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच त्यानें केलेली मसलत महाराजांस पसंत पडून ते जर त्याच्या म्हणण्याप्रमाणें वागले असते तर मराठी राज्याचा बराच फायदा झाला असता अशीही आशा करण्यास हरकत नव्हती. असो.

जनार्दनपंतास कैदेंतून सोडल्यानंतर लौकरच रघुनाथपंत मरण पावल्यानें कर्नाटक प्रांतीं जनार्दनपंतास मुख्य कारभारी म्हणून महाराजांनीं पाठविलें. जिंजी प्रांताचा सर्व

अधिकार हरजीराजे महाडीक यांस सोंपवून मोरोपंत पेशव्याच्या मुलास त्याच्या हाताखालीं मुतालीक नेमून रवाना केलें.

मुलांनो! आतांपर्यंतच्या हकीगतीवरून तुमच्या सहज ध्यानांत येईल कीं, शिवाजी राजांच्या मरणानंतरचीं पहिलीं सुमारें दोन वर्षें, संभाजी महाराजांनीं स्वतःस गादी मिळविणें व ती मिळूं नये म्हणून ज्या लोकांचे त्यांच्या दृष्टीनें प्रयत्न होते त्यांचें पारिपत्य करण्यांत वगैरे खर्च केलीं. अशा तऱ्हेनें आपल्या शत्रूंचा नायटाच केल्यानंतरच त्यांची दृष्टी राज्याच्या शत्रूंकडे वळली.

पहिल्यानें त्यांचें लक्ष्य जंजिऱ्याच्या शिद्दीकडे वळलें शिद्दी लोक वारंवार आपल्या प्रांतांत येऊन लुटालूट करतात, लोकांस धरून नेतात, जाळपोळ करतात वगैरे गोष्टींबद्दल त्यांचा सूड घेण्याचा महाराजांनीं बेत केला. या वेळीं याकुबखान हा शिद्दी लोकांचा मुख्य होता. त्या लोकांत फितुर करण्यासाठीं महाराजांनीं खंडूजी फरजंद यास आपण मराठे राज्यांतून फितुर होऊन आल्याचा बहाणा करून जाऊन याकुबखानाचे चाकरीस रहाण्यास पाठविलें. मराठ्यांनीं

जंजिऱ्यावर बाहेरून हल्ला केला म्हणजे खंडूजीनें आंतील लोकांस फितुर करून आंतील दारू गोळ्यास बत्ती लावून द्यावी अशी महाराजांनीं मसलत ठरविली व त्याप्रमाणें जंजिऱ्यावर बाहेरून हल्ला करण्यासाठीं दादजी रघुनाथ देश-पांडे यास बरोबर पुष्कळ सैन्य देऊन पाठविण्यांत आलें व तो त्या हल्ल्यांत यशस्वी झाल्यास अमात्यपद देण्याचें महा-राजांनीं त्यास वचन दिलें.

जंजिऱ्यास आंतील लोकांस फितुर करण्यास गेलेल्या खंडूजी फरजंदाचें कारस्थान दुर्दैवानें उघडकीस आल्यानें त्यास व त्याच्या साथीदारास शिद्दी लोकांनीं ठार मारिलें. तरीपण या गोष्टीनें संभाजी महाराज नाउमेद न होतां स्वतः दादजी रघुनाथच्या मदतीस गेले व जंजिऱ्याची खाडी बुज-वून मग किल्ल्यावर हल्ला करावा अशा बेतानें त्यांनीं तें काम सुरू केलें; परंतु इतक्यांत मोंगलांच्या फौजेनें पनवेलकडील भाग लुटून कल्याण प्रांत लुटण्यासाठीं ती तिकडे जात असल्याची हकीगत महाराजांस समजतांच त्यांनीं आपला

मोर्चा तिकडे वळविला. दोन्ही सैन्याची लवकरच भेट होऊन महाराजांनीं मोंगल फौजेवर जोराचा हल्ला करून तिला अहमदनगरास पळून लाविलें.

इकडे जंजिऱ्यावर हल्ला करण्याचें काम दादजी रघुनाथानें चालू ठेविलेंच होतें. त्यानें किल्ल्यावर एकदम चारी बाजूनें हल्ला केला. परंतु खडकांवर निसरडें असल्यामुळें त्याच्या लोकांचे पाय त्यांवर ठरेनात व आंतून शिद्दी जोराचा मारा करीत असल्यामुळें दादजी रघुनाथचा नाइलाज होऊन त्यास मागें हटावें लागलें. जंजिऱ्याचाया या मोहिमेंत मराठ्यांकडील बरेच लोक ठार झाले.

वरील लढाईत जय मिळल्यामुळें शिद्दी लोकांनीं मराठ्यांच्या राज्यांत स्वाऱ्या करून गांव जाळणें, गाई मारणें, बायका धरून नेणें वगैरे क्रम सुरू केले. एके वेळीं तर त्यांनीं खुद्द दादजी रघुनाथ याच्या बायकोसच धरून नेलें महाराज या गोष्टीवरून फार चिडले व "तुम्ही शिद्दी लोकांविरुद्ध न उठतां, त्यांच्याशीं सलोखा ठेवितां याबद्दल तुम्हालाच शासन करूं" अशी महाराजांनीं इंग्लिश व

पोर्तुगीज लोकांस धमकी दिली. शिवाय शिद्दी मिसरी नांवाचा याकुबखानाचा एक नातलग महाराजांस येऊन मिळाला होता. त्याजबरोबर महाराजांनीं आपलें आरमार देऊन त्यास याकुबखानावर पाठविलें. दोन्ही आरमारांचीं भेट ठाण्याजवळ होऊन त्यांचें निकराचें युद्ध झालें. या लढाईतही मराठ्यांचाच पराभव झाला. शिद्दी मिसरी यास जखमा होऊन तो जहाजांसुद्धां याकुबखानाच्या हातीं पडला. याशिवाय मराठ्यांचीं तीन जहाजें शत्रूच्या हातीं लागलीं व कित्येक त्यांच्या हातीं लागूं नये म्हणून मराठ्यांनीं स्वतः होऊन बुडवून टाकिलीं.

येणेंप्रमाणें या वेळींही पराभव झाल्यामुळें महाराजांस इंग्लिशांचा बराच राग आला व म्हणून त्यांचा सूड घेण्याचा त्यांनीं विचार केला. परंतु इतक्यांत औरंगजेब बादशाहा दक्षिणेंत स्वारी करण्याकरितां मोठी तयारी करीत असून त्यानें आपला मुलगा सुलतान मोआझिन यास पुढें रवाना केला असल्याची बातमी त्यांस लागली. त्यामुळें इंग्लिशांचा सूड घेण्याचा विचार तहकूब करून उलट

मोंगलांच्या विरुद्ध महाराजांनीं त्यांच्याशीं तहाचें बोलणें लावलें. या बोलण्याचा शेवट निकाल कांहीं झाला नाहीं.

सुलतान मोआझीम यानें इकडे कल्याण प्रांतावर स्वारी करून तो लुटण्यासाठीं आपला सरदार रणमस्तखान यास पाठविलें. परंतु महाराजांनीं रणमस्तखानाचें कांहीं चालूं न देतां त्यास अहमदनगराकडे पिटाळून लाविलें.

पोर्तुगीज लोकांनीं मात्र मराठ्यांस फार त्रास दिला. त्यांनीं मराठ्यांचीं गांवें लुटावीं, जाळून टाकावीं व जिवंत हातीं सांपडतील त्या लोकांस बळजबरीनें बाटवून ख्रिस्ती करण्याचा क्रम ठेविला होता. संभाजी महाराजांनीं पोर्तुगीज लोकांच्या चौल येथील ठाण्यावर हल्ला केला, परंतु त्या लोकांनीं त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. इकडे गोंव्याच्या गव्हर्नरानें समुद्रावर बंदोबस्त करून त्यानें फोंडा येथील मराठ्यांच्या किल्ल्यास वेढा देऊन तो घेण्यासाठीं तो स्वतः गेला. महाराजांस ही बातमी समजतांच ते ताबडतोब मोठें सैन्य घेऊन किल्ल्याचे रक्षणास धांवले. पोर्तुगीज लोकांच्या मानानें मराठ्यांचें सैन्य पुष्कळ

कमी होतें. परंतु मराठ्यांनीं फोंडा दिसूं लागतांच पोर्तुगीज लोकांच्या पिछाडीवरील सैन्यावर हल्ला करण्यास सुरवात केली. गव्हर्नर मोठा धोरणी होता. यावेळीं किल्ल्याचा वेढा तसाच राहूं दिल्यास मराठे लोक आपला गोंव्यास जाण्याचा रस्ता अडवितील व कदाचित् ते गोंवाही घेतील अशी त्यास भीती वाटून त्यानें वेढा उठवून मागें फिरण्याचा बेत केला व त्याप्रमाणें तो गोंव्यास जाऊन कसाबसा पोंचला. परंतु फोंडा येथें त्याचा बराच दारुगोळा, दाणागोटा वगैरे सामान राहिलें तें मराठ्यांच्या हातीं लागलें. शिवाय त्याचे बरेच लोकही ठार झाले.

वरप्रमाणें जय मिळतांच पोर्तुगीज लोकांचा पाठलाग करून व त्यांच्यापूर्वीं गोंव्यास पोंचून त्यावर हल्ला करून तें हस्तगत करून घ्यावें असा महाराजांनीं विचार केला व त्याप्रमाणें ते गोंव्याच्या खाडीपर्यंत जाऊन पोंचले. परंतु याच सुमारास खाडीस भरती येऊं लागल्यामुळें ते थोडे विचारांत पडले. तथापि शेवटीं त्यांनीं आपला घोडा धीरानें तसाच खाडींत सोडला. त्यांच्या मागोमाग सरदार शिपायांनींही आपली

घोडी खाडींत ढकलली. परंतु पाणी जास्त जास्त चढूं लागतांच महाराजांस माघार घेणें भाग पडलें.

यावेळीं खंडो बल्लाळ चिटणीस महाराजांबरोबर खाडींत होता. खाडींचें पाणी चढून महाराजांच्या घोड्याच्या जिनास लागलेलें पहातांच खंडो बल्लाळानें आपल्या जिवाकडे न पहातां पाण्यांत उडी टाकून महाराजांस घोड्यासह सुखरूपपणें पोहून बाहेर काढिलें. त्यावेळीं महाराज त्याच्यावर फार खूष झाले व “ उगीच लोकांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून तुझ्या वडिलांस ठार केलें असें असतां देखील आज तूं इमानास जागलास ” अशा अर्थाचे महाराजांनीं उद्गार काढले. व आणखी “ महाराज ( शिवाजीराजे ) तुझ्या वडिलांवर ज्याप्रमाणें विश्वास ठेवीत होते त्यापेक्षांही मी तुजवर जास्त विश्वास ठेवीन ” असें महाराजांनीं त्यास आश्वासन दिलें व घोडा व पोषाक त्यास बक्षीस दिला. दुसऱ्या ज्या लोकांनीं यावेळीं असें साहस दर्शविलें होतें त्यांसही महाराजांनीं योग्य बक्षीस देऊन सर्वांस संतुष्ट केलें.

ऐन वेळीं खाडीस भरती येऊन मागें फिरावें लागलें म्हणून संभाजी महाराजांचा एक प्रकारें हिरमोड झाला खरा; तरी पण त्यांनीं अगदीं नाउमेद न होतां गोवें हस्तगत करून घेण्याचा बेत तहकूब केला नाहीं. त्यांनीं नावा आणवून दोनशें लोक त्यांत बसवून त्या खाडींत ढकलल्या व आणखीही नावा ढकलण्याच्या ते तजविजींत होते. परंतु पोर्तुगीज लोकांनीं समोरच्या किनाऱ्यावरून नावा पाठवून पुढें आलेल्या दोनशें लोकांसच गांठून त्यांजवर हल्ला करून त्यांचा नाश केला. त्यामुळें संभाजी महाराजांस नाइलाजास्तव आपला हेका सोडून देणें भाग पडलें.

यानंतर महाराजांनीं पोर्तुगीज लोकांच्या वसई व दमण यांमधील कित्येक ठाण्यांवर हल्ला करून त्यांचा नाश केला. त्यामुळें पोर्तुगीज लोकांनीं कंटाळून जाऊन महाराजांशीं तहाचें बोलणें लाविलें. परंतु "तहाचें बोलणें लावण्यापूर्वीं तुह्मी आम्हांस पांच कोट होन द्यावे," अशी महाराजांनीं त्यांस अट घातली. यापुढें तहाचें बोलणें झालें नाहीं. महाराजांनींही पोर्तुगीज लोकांस त्रास देण्याचें सोडून दिलें.

मागें लिहिल्याप्रमाणें औरंगजेबानें दक्षिणेवर स्वारी करण्यासाठीं खरोखरच मोठी तयारी केली व आपल्या मागें आपल्या राज्याची दुर्दशा होऊं नये ह्मणून व आपण असूं तेथें आपणास लढाईच्या खर्चास लागणारा पैसा वेळोवेळीं मिळत जावा ह्मणून त्यानें ठिकठिकाणीं योग्य बंदोबस्त करून तो बऱ्हाणपुरास येऊन दाखल झाला. त्याच्या या दक्षिणच्या स्वारीचा थाट फार अपूर्व होता असें सांगतात.

दक्षिणेंत आल्यावर औरंगजेबानें आपले मुलगे मुआझीम व अजीम यांस संभाजी महाराजांचा मुलूख घेण्यासाठीं पुढें पाठविलें. महाराजांनीं मुआझीमचा पराभव करून त्यास पिटाळून लावल्याची हकीगत वर आलीच आहे. इकडे अजीम यास विशेष प्रयास न करतां सुरतेजवळील साल्हेरचा किल्ला फितुरीच्या योगानें मिळाला. त्यानंतर त्यानें रामजेसचा किल्ला घेण्यासाठीं तिकडे मोर्चा वळविला. ही हकीगत सेनापति हंबीरराव मोहिते यास समजतांच तो आपल्या फौजेनिशीं तिकडे पोंचला. दोन्ही सैन्याची लौकरच गांठ पडून त्यांत पराभव पावल्यामुळें हंबीरराव

मागें परतला. मोंगल त्याचा पाठलाग करूं लागल्यामुळें शेवटीं तोच अडचणींत सांपडला व त्याचे पुष्कळ लोक मारले गेले. यामुळें औरंगजेबानें त्यास परत बोलावून घेतलें.

नंतर रामजेसचा किल्ला घेण्यासाठीं औरंगजेबानें, पुढें प्रसिद्धीस आलेल्या निजामउल्मुल्कचा बाप, शहाबुद्दीन यास पाठविलें. रामजेसच्या किल्लेदारानें या वेळीं अतोनात पराक्रम दाखवून शहाबुद्दीन याचा पुरा मोड केला. यानंतर औरंगजेबानें दुसऱ्या एक दोन सरदारांच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यांजकडून रामजेसच्या किल्ल्यावर पुष्कळ वेळां जोराचे हल्ले करविले; परतु मोंगलांस एकही वेळ यश मिळालें नाहीं.

मागें लिहिल्याप्रमाणें मुआज्जमच्या फौजेचा कल्याण प्रांतांत पराभव झाल्यानंतर तो दक्षिण कोंकणांत शिरून वेंगुर्ल्यापर्यंत सर्व प्रांत उध्वस्त करून, मराठे गोवें काबीज करतील तर त्यांस अडथळा करण्यासाठीं तो गोव्याजवळ छावणी देऊन राहिला. परंतु येथें त्याच्या सैन्याचे फार

हाल झाले. त्यांस दाणागोटा न मिळाल्यामुळें त्यांची उपासमार होऊं लागली. औरंगजेबानें त्यांच्यासाठीं सुरतेहून जहाजांतून अन्नसामुग्री पाठविली. परंतु संभाजी महाराजांच्या लोकांनीं त्यांतील बरींच जहाजें लुटलीं. एकीकडून उपासमार व त्यांतच रोगाची सांथ उद्भवल्यामुळें मुआझीम बराच हैराण होऊन मागें परतला व कसाबसा कृष्णा नदीचे कांठीं वाळवें येथें येऊन पोंचला.

मुलांनों, वरील एकंदर हकीगतीवरून तुमच्या सहज ध्यानांत येईल कीं, संभाजी महाराजांस यावेळीं ठिकठिकाणीं शत्रूंस तोंड दाखवावें लागत होतें व त्यामुळें त्यांस स्वतंत्रपणें कोणतीहि स्वारी करण्यास सवड नव्हती. तरीपण त्यांनीं इ. स. १६८५ च्या आक्टोबर महिन्यांत मोठें धाडस करून अचानक भडोच शहरावर स्वारी करून तेथील अलोट संपत्ति लुटून नेली. भडोचहून परत फिरतांना नाशकाजवळ आल्यावर संभाजी महाराजांच्या फौजेंतील एक टोळी गंगास्नानाच्या निमित्तानें दूर गेली व तेथून ती मोंगलांस मिळणार होती. ही हकीगत महारा-

जांच्या कानीं जातांच त्यांनीं दुसरी एक टोळी गंगास्नाना-च्याच निमित्तानें पहिल्या टोळीचें पारिपत्य करण्यासाठीं पाठविली. दोन्ही टोळ्यांची लौकरच गांठ पडली. प्रथमतः या दुसऱ्या टोळींतील लोकांनीं पहिल्या टोळींतील लोकांशीं स्नेह दाखविला व मागाहून उग्ररूप धारण करून आपला हेतु त्यांच्या नजरेस आणून त्यांचा नायनाट केला.

भडोचच्या स्वारीपूर्वी संभाजी महाराजांनीं एक टोळी इतक्या जलद उत्तरेकडे पाठविली कीं, तिनें कोणासही आपला मागमूस लागूं न देतां बऱ्हाणपुरापर्यंतचा मोंग-लांच्या ताब्यांतील मुलूख जाळून पोळून फस्त केला. ही हकीकत औरंगजेबास कळतांच त्यानें आपला सरदार बहा-दुरखान याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यास त्या टोळीचा पाठलाग करण्यास पाठविलें. परंतु मराठ्यांची टोळी त्यांच्या हातीं सांपडली नाहीं. मराठे इतक्या जलद प्रवास करीत कीं, ते व मोंगल यांच्यामध्यें कमींत कमी सहा दिवसांचें तरी अंतर पडे.

असो. अशा तऱ्हेनें मराठ्यांचें राज्य बुडविण्याचा

औरंगजेबास सहज साध्य होईल असा वाटणारा हेतु तडीस न गेल्यामुळें त्याचा बराच हिरमोड झाला; व युद्ध करून संभाजी महाराजांचा व त्यांच्या राज्याचा नाश करणें पूर्ण-पणें अशक्य असल्याचें त्याच्या लक्षांत आलें. अर्थात्च त्यानें तूर्त मराठ्यांचा नाद सोडून आपला मोर्चा विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें घेण्याकडे वळविला.

आतांपर्यंतच्या सर्व हकीगतीवरून, मुलांनों, तुम्हांस कळलें असेलच कीं, संभाजी महाराज हे अत्यंत शूर असून ते त्या गुणामध्यें शिवाजी राजांस पुत्र शोभत होते. परंतु वडिलांचे इतर गुण त्यांचे अंगीं नव्हते. ज्यावेळीं ते लढाईवर गुंतले नसत त्यावेळीं ते आळसांत व व्यसनांत आपली काळक्रमणा करीत असत. शिवाय मोहिमेवर असतां तिकडे मोहिमेची व इकडे राज्यकारभाराची उत्तम व्यवस्था एकाच वेळीं ठेवण्याची शिवाजी राजांची हातोटी संभाजी महाराजांच्या अंगीं नव्हती. इतकेंच नव्हे तर राज्यकार-भारामध्यें लक्ष्य घालण्याची त्यांस बिलकुल हौस नव्हती. त्यामुळें त्यांत अत्यंत अव्यवस्था झाली. आधींच शिवाजी

राजांच्या वेळचीं विश्वासू व चांगलीं माणसें महाराजांनीं मारून टाकिलीं होतीं व सर्व कारभार कलुषाचे हातीं देऊन त्यास अष्टप्रधानांपैकीं एक जागा दिली होती. तशांत इ. स. १६८३ त मोरोपंत पेशवे मरण पावले. त्यामुळें तर कलुषाचे हातीं सर्व राज्यसत्ता आली व तो करील ती पूर्वदिशा अशी स्थिती झाली. दिवसेंदिवस महाराज त्याचे अधिकाधिक स्वाधीन होऊं लागले व त्याच्यावर त्यांची इतकी बहाल मर्जी झाली कीं, त्यांनीं त्यास "छंदोगामात्य कवि कलश पंडितराव" असा मोठा किताब देऊन त्याचा गौरव केला.

कलुषाचें वजन राज्यांत एवढें वाढलें कीं, महाराज त्याचेशिवाय कोणाचीही भेट घेत नसत. सुदैवानें एकाद्याचा त्यांच्याशीं भेटीचा योग आल्यास महाराज त्याचें म्हणणें ऐकून न घेतां ते त्यास कलुषाकडे धाडीत. यामुळें महाराजांवर सर्व प्रजा देखील नाराज झाली.

संभाजी महाराजांची अशी समजूत होती कीं, शिवाजी राजांनीं इतका पैसा जमवून ठेविला आहे कीं तो

कधींच संपावयाचा नाहीं. परंतु हा त्यांचा भ्रमाचा भोंपळा लवकरच फुटला. कारण त्यांनीं जेवढ्या लढाया मारल्या त्यांतून फारशी संपत्ती न मिळतां उलट होती तीच खर्च होत गेली. शिवाय कर्नाटक प्रांतांतून वसूल येण्याचें ही बंद झालें. त्यामुळें राज्याचें उत्पन्न वाढविण्यासाठीं कलुषानें जमिनीचा सारा वाढविला. प्रजेस नाखूष होण्यास हें एक कारण विशेष झालें.

शिवाजी राजांच्या वेळीं कडक शिस्त असे. कोठूनही लूट मिळवून आणल्यास ती सर्व राजांच्या स्वाधीन केली जात असे. राजांनींही सैन्यांतील लोकांचा पगार वेळचे वेळीं मिळत जावा अशी व्यवस्था ठेविली होती. लष्करांत कोणींही बायका माणसें घेऊं नये असा त्यांनीं नियम ठरवून दिला होता. शिवाजी राजांच्या वेळचे हे कायदेकानू आतां पार झुगारून द्यावे लागले; कारण खजिन्यांत पैसा नसल्यामुळें लोकांस नियमितपणें पगार मिळेनासा झाला. त्यामुळें ज्यास जी लूट मिळेल ती तो दाबून बसूं लागला. शिवाय शत्रूच्या मुलखांतील बायका धरून आणून त्या बटकी

ह्मणून लोकांस विकून त्यावर हे लोक पैसा मिळवूं लागले. अशी स्थिती झाल्यामुळें खजिन्यांत भर पडेनाशी होऊन शेवटीं मिळवून आणलेल्या लुटींतून कांहीं भाग स्वतःस ठेवून घ्यावा असा नियम शिपाई लोकांस घालून देणें संभाजी महाराजांस भाग पडलें.

वास्तवीक खजिन्याची खरी स्थिति महाराजांस माहीत नव्हती व कलुषासही ती महाराजांच्या कानीं घालण्याचा धीर होत नसे. कारण त्यास असें वाटे कीं, महाराजांची आपल्यावर खप्पा मर्जी होऊन आपला घात व्हावयाचा. यासाठीं आलेली अडचण कशी तरी निभावून नेण्यापलीकडे कलुषासही कांहीं मार्ग राहिला नव्हता.

शिवाजी राजांच्या राज्यविस्ताराविषयीं कलुषा असें ह्मणत असे कीं, " एवढें मोठें राज्य काय करावयाचें आहे ? कारण त्याचा योग्य बंदोबस्त ठेवतां येत नाहीं. कर्नाटकांतील एकाद्या किल्ल्यास शत्रूंनीं वेढा दिल्याची हकीगत समजून त्या किल्ल्याचे मदतीस इकडून सैन्य जाई-

पर्यंत तो शत्रूंनीं हस्तगत करून घ्यावा. त्यामुळें लोक मारले जाऊन नुकसान होतें व दुर्लौकीकही होतो. राज्य ह्मणजे लहान व जवळपास असावें. ह्मणजे त्याचा सहज बंदोबस्त ठेवतां येतो व नोकर लोकांवरही योग्य देखरेख ठेवितां येते." अशा तऱ्हेचे आपले विचार कलुशा कधीं कधीं महाराजांस बोलून दाखवीत असे व महाराजही तें निमूट-पणें ऐकून घेत असत याबद्दल शिवाजी राजांच्या वेळच्या हयात असलेल्या लोकांस वाईट वाटत असे, व आपलें जिणें व्यर्थ असेंही त्यांस वाटत असे.

महारजांचे आप्त पिलाजी शिरके, तानाजी व गणोजी शिरके वगैरे मंडळींनें, राजा वेडा झाला व कलुषाच्या स्वाधीन झाला असून राज्यहानी होत असल्याचें पाहून महाराजांच्या मुलास गादीवर बसवून राजाराम महाराजांस मुक्त करून त्यांजकडून राज्यकारभार चालवावा अशी मस-लत केली. ही मसलत कशी तरी फुटून महारजांचे कानीं गेली. आधींच महाराज क्रूरबुद्धीचे, मग त्यांस वरील हकी-गत समजतांच काय विचारावयाचें ? तावडतोब शिरक्यांच्या

घरांवर जप्ती पाठवून तीं लुटून जाळून टाकिलीं. एक दोन शिरके सांपडले ते मारून टाकिले व जितके शिरके सांपडतील तितके मारून टाकावे असा हुकूम सोडला. त्यामुळें कित्येक शिरके कुटुंबासह हबसाणांत जाऊन राहिले व कांहींनीं मोंगलांच्या चाकऱ्या पतकरल्या.

मागें सांगितल्याप्रमाणें औरंगजेबानें संभाजी महाराजांचें राज्य घेण्याचा नाद सोडून विजापूर व गोवळकोंडें हीं राज्यें घेण्याकडे आपला मोर्चा फिरविला व त्यानें इ. स. १६८६ च्या आक्टोबर महिन्यांत विजापूरचें व इ. स. १६८७ च्या सप्टेंबर महिन्यांत गोवळकोंड्याचें अशीं दोन्हीं राज्यें मिळविलीं. हीं राज्यें हातांत पडल्यावर औरंगजेबाचें लक्ष्य पुन्हा मराठ्यांच्या राज्याकडे वळलें.

विजापूर दरबारचा नांवाजलेला सरदार सर्जेखान हा तें राज्य औरंगजेबाच्या ताब्यांत गेल्यानंतर त्याच्या तैनातीस राहिला होता. या सर्जेखानाच्या हाताखालीं बरेंच सैन्य देऊन व विजापूर दरबारांतील जुन्या मराठे

सरदारांस त्यास मदत करावयाचा हुकूम करून, त्यास मराठी राज्याच्या दक्षिणेकडीस मुलूख काबीज करण्यास औरंगजेबानें पाठविलें. मराठ्यांचा सेनापति हंबीरराव मोहिते वांईजवळ तळ देऊन राहिला होता. दोन्ही सैन्याची गांठ वांईजवळच पडून तेथें त्यांचें निकराचें युद्ध झालें व त्यांत मोंगलांचा पूर्ण पराभव झाला. परंतु लढाईचे गर्दींत खुद्द हंबीररावास जखम होऊन तो मरण पावला. सेनापति पडला तरी मराठ्यांच्या फौजेची हिंमत खचली नाहीं, व त्यांनीं जय मिळविला हें खरें, तरी पण हंबीररावाच्या मृत्यूमुळें मराठ्यांच्या राज्याची मोठी हानी झाली.

यानंतर औरंगजेबानें कर्नाटक प्रांत जिंकण्याचें ठरवून तिकडे फौज रवाना केली. ही बातमी संभाजी महाराजांस कळतांच कर्नाटकांतील आपल्या प्रांताच्या रक्षणासाठीं मोरोपंत पेशव्यांचा भाऊ केसोपंत याच्या हाताखालीं सैन्य देऊन त्याची त्यांनीं तिकडे रवानगी केली. कर्नाटकचा कारभारी रघुनाथपंत मरण पावल्यानंतर त्याचें काम हरजी राजे महाडीक व मोरोपंत पेशव्याचा मुलगा निळोपंत यांज-

कडे सोंपविल्याचें मागें लिहिलेलें, मुलांनों, तुह्मांस आठवत असेलच. या हरजी राजे महाडिकानेंच यावेळीं अतुल पराक्रम व स्वामिनिष्ठा दाखवून आपल्या ताब्यांतील मुलूख शाबूद राखला. नाहीं तर केसोपंत व निळोपंत यांचें तेथें जें वैमनस्य पडलें त्यामुळें मराठ्यांचा कर्नाटकांतील मुलूख सहज मोंगलांच्या हातीं लागला असता. असो. याप्रमाणें कर्नाटकाच्या स्वारींतही मोंगलांस मराठ्यांविरुद्ध कांहीं करतां आलें नाहीं.

मुलांनो, तुह्मी मागें वाचल्याप्रमाणें औरंगजेबानें मराठ्यांचें राज्य घेण्याचा नाद सोडून विजापूर व गोवळकोंड्याचीं राज्यें घेण्याकडे आपलें लक्ष वळविल्यावर, संभाजी महाराजांस प्रत्यक्ष असें लढाईचें काम कांहीं न राहिल्यामुळें त्यांचा बहुतेक वेळ दारू वगैरे व्यसनांत जाऊं लागला. औरंगजेबास जरी लढाई करून मराठ्यांचें राज्य घेतां आलें नाहीं तरी कांहीं तरी कपट करूनच त्यांचें राज्य घ्यावें असा त्यानें बेत केला होता. महाराजांस औरंगजेबाचा कपटी स्वभाव माहीत होता. यामुळें कर्नाटक प्रांत काबीज करण्या-

साठीं जरी आपलें सैन्य औरंगजेबानें तिकडे पाठविलें होतें तरी तो खुद्द आपणावर केव्हां झडप घालील याचा नेम नाहीं हें महाराज पूर्णपणें जाणून होते व ह्मणूनच ते पन्हाळा व विशाळगड या दोन किल्ल्यांत योग्य बंदोबस्त ठेवून कधीं या किल्ल्यांत तर कधीं त्या व कधीं कधीं संगमेश्वरीं रहात असत.

महाराजांनीं अंदाज केल्याप्रमाणें औरंगजेबानें खरोखरच एक वेळ पन्हाळ्यास वेढा देवविला. परंतु तो किल्ला त्याच्या हातीं लागला नाहीं. विजापूरच्या राज्यापैकीं संभाजी महाराजांनीं मिळविलेलीं कित्येक ठाणीं औरंगजेबानें परत घेतलीं. परंतु किल्ल्यांपुढें त्याचा इलाज चालेना. शेवटीं त्यानें आपल्या फौजेचे तीन मोठे भाग करून ते तीन ठिकाणांहून मराठ्यांच्या मुलुखावर पाठविले. एक भाग नाशिकाकडून, दुसरा कोंकणांतून व तिसरा कोल्हापूरच्या बाजूनें.

कोल्हापूरच्या बाजूनें जाणाऱ्या सैन्याचें आधिपत्य तकरीबखान नांवाच्या एका हुषार सरदाराकडे होतें. त्यानें

प्रथमतः पन्हाळा किल्ल्याखालचा सर्व मुलख जिंकून नंतर तो किल्ला घेण्याच्या तयारीस लागला. शिवाय त्यानें स्वतः संभाजी महाराज, त्यांचे सरदार, त्यांच्या फौजा वगैरे कोठें असतात, काय करतात याचा बारकाईनें तपास चालविला. असा तपास करतां करतां त्यास सहाजीकच बातमी लागली कीं, संभाजी महाराज संगमेश्वरीं पुष्कळ वेळ रहातात व तेथें ते फारस बंदोबस्तानें रहात नाहींत. या बातमीमुळें त्यास आनंद होऊन गुप्तपणें संगमेश्वरीं जाऊन महाराजांस अचानक पकडण्याचा त्यानें बेत केला.

वरप्रमाणें बेत करून तकरीबखानानें जरूरी पुरतें सैन्य घेऊन व डोंगरांतील रस्त्यांचे माहीतगार असे वाटाडे बरोबर घेऊन कोल्हापूर सोडलें. त्याच्याबरोबर त्याचा हुशार व शूर मुलगा इकलासखान हा होता. तकरीबखानानें आपण महाराजांकडे वकिलीस जात आहों असा बहाणा करून गुपचूप रीतीनें एकदम संगमेश्वर गांठलें.

मोंगल लोक लबाडी करून गढीपर्यंत येऊन पोंचल्याची बातमी जासुदांनीं घाबऱ्या घाबऱ्या संभाजी महाराजांस

कळविली. महाराज त्यावेळीं दारूच्या धुंदींत असल्यानें ते जासुदांवरच रागावले व त्यांस शिव्या देऊन, " भलत्याच कांहीं तरी खोट्या बातम्या आणतां? मोंगल येथें कोठून येतील? पुन्हा असें बोलाल तर तुमचीं नाकेंच कापीन" असें ह्मणाले. इतक्यांत तकरीबखानाचे लोक गढीच्या दरवाजाशीं येऊन पोंचले. ते आलेसे पाहून आंतील लोक दरवाजे लावून घेऊं लागले. तोंच इकलासखान हा थोड्याशा लोकांसह दरवाजांत घुसला व तो बंद करणाऱ्या लोकांस ठार मारून आंत घुसला. तें पाहून संभाजी महाराजांचे बहुतेक लोक पळून गेले. कलुषानें मोंगलांस अडथळा करण्याचा प्रयत्न केला. परंतु जखमी झाल्यामुळें तो त्याच्या हातीं सांपडला. स्वतः महाराजांनीं वेष पालटला होता व ते पळून जाण्याचा बेतांत होते. परंतु त्यांच्या अंगावरील दागिने तसेच राहिल्यामुळें शत्रूंनीं त्यांस ओळखिलें व अशा रीतीनें शेवटीं संभाजी महाराज मोंगलांच्या हातीं लागले.

तकरीबखानानें महाराजांस कलुषासह प्रथम कोल्हापुरास नेलें व औरंगजेबाच्या हुकमाप्रमाणें तेथून त्यानें

तेथून त्यानें त्यांस तुळापुर येथें नेलें. तुळापुरास पोंचतांच महाराज, कलुषा व त्यांचेबरोबर पकडले गेलेले इतर लोक यांस, मुसक्या बांधून व उघडे बोडके करून, उंच अशा उंटावर बसवून पुढें तासे वगैरेसारखीं कर्कश वाद्यें वाजवीत त्यांस बादशहाच्या छावणीकडे नेण्यांत आलें. औरंगजेबासमोर त्यांस उभें करतांच त्यानें तूर्त त्यांस कैदेंत ठेवावें असा हुकूम केला. नंतर आपल्या सरदारांच्या सल्ल्या-प्रमाणें संभाजी महाराजांस जिवंतच ठेवावें म्हणजे त्यांच्यामुळें त्यांचे पुष्कळसे मजबूत किल्ले आपल्या सहज हातीं लागतील असा औरंगजेबानें विचार केला. परंतु, मुलांनों, तुम्हांस माहीत असेलच कीं, औरंगजेबाच्या डोक्यांत धर्मवेड फार होतें. हिंदु लोकांस बाटवून जुलमानें मुसलमान केल्यास धर्मप्रसार केल्याचें आपणांस पुण्य लागेल अशी त्याची समजूत होती. या त्याच्या समजुतीप्रमाणें संभाजी महाराजांस बाटविण्याचा त्यानें विचार केला.

इकडे महाराजांची स्थिति फार चमत्कारिक झाली होती. त्यांस शत्रूंनीं केलेला अपमान सहन न होऊन अशा स्थितींत रहाण्यापेक्षा मरण येईल तर बरें असें त्यांस वाटत

होतें. त्यांस औरंगजेबाच्या छावणीकडे नेत असतां ते शिपायांस उघड उघड शिव्या देत होते. कारण त्यामुळें तरी एखाद्या शिपायानें चिडून आपणास ठार मारावें असा त्यांचा हेतू होता.

महाराजांच्या मनाची अशी स्थिति झाली असतां " तुम्ही मुसलमान झाल्यास आम्ही तुम्हास जीवदान देऊं " असा औरंगजेबानें त्यांस निरोप पाठविला. महाराज अगोदरच जीवास कंटाळले होते, त्यांतच त्यांस असा निरोप पोंचतांच त्यांनीं पैगंबरास शिव्या दिल्या व " तुमची मुलगी तुम्ही आम्हांस दिल्यास आम्ही मुसलमान होतों " असा जबाब पाठविला.

महाराजांचें अशा प्रकारचें उद्धटपणाचें उत्तर ऐकून औरंगजेबाच्या अंगाचा तिळपापड झाला. त्यानें लगेच लोखंडाची सळी तापवून महाराजांच्या डोळ्यांत खुपसण्यास व नंतर त्यांची जीभ कापून त्यांचा शिरच्छेद करण्याचा हुकूम केला. त्यावरून हजारों लोकांच्या देखत अशा तऱ्हेनें महाराजांचा वध करण्यांत आला. इ. स. १६८९. त्याच वेळेस औरंगजेबानें कलुषाचाही वध करविला.

संभाजी महाराजांचा वध झाल्याचें समजून औरंग-जेबाच्या बहिणीस फार वाईट वाटलें व " त्यांचा प्राण माझे नांवें करून गेला. याउपर आपण दुसरा भ्रतार करणार नाहीं " असा तिनें निश्चय केला. नंतर तिनें " महाराजांच्या पत्नीस व मुलास अभय देऊन त्यांस माझे स्वाधीन करावें " असा औरंगजेबाकडे हट्ट घेतला व त्यानेंही तिचा तो हट्ट पुरविला. असो.

संभाजी महाराजांनीं एकंदर नऊ वर्षें राज्य केलें. या नऊ वर्षांत त्यांनीं कसकशा लढाया मारल्या व जय मिळविले हें, मुलांनों, तुम्ही आतांपर्यंत वाचलेंच. त्यावरून तुमच्या लक्ष्यांत आलें असेलच कीं, महाराज म्हणजे एक विलक्षण धाडशी पुरुष होते. या धाडसाच्या जोडीस त्यांस जर राज्यकाभार चांगला व्यवस्थेशीर चालविण्याचें धोरण असतें तर त्यांची अशी स्थिति झाली नसती. राज्यकार-भारास सुरवात करतांनाच त्यांनीं वडिलांच्या वेळच्या हुशार माणसांचा नायनाट करून टाकला, ही त्यांची मोठी चूक होय. त्यानंतर ते जे कुलुषाच्या तावडींत सांपडले त्यामुळें त्यांनीं आपण होऊनच मराठी राज्यावर संकट ओढून

आणल्यासारखें झालें. कलुषाचा त्यांच्या मनावर एवढा पगडा कसा बसला ही आश्चर्य करण्याजोगी गोष्ट आहे. महाराज म्हणजे त्याच्या हातांतील एक बाहुलें झालें होतें. तो सांगेल त्याप्रमाणें ते वागत. इतकेंही असून त्यांस जर दारूसारखें घाणेरडें व्यसन जडलें नसतें तर त्यांचा असा अमानुष रीतीनें वध होईपर्यंत पाळी आली नसती. शेवटीं तरी काय? केवळ दारूच्या धुंदींत असल्यानेंच ते शत्रूंच्या हातांत जिवंत सांपडले.

सर्व व्यसनांत दारूचें व्यसन म्हणजे अत्यंत वाईट होय. कारण दारू पिऊन मनुष्य बेशुद्ध झाल्यानंतर तो मूळचा कितीही शहाणा असला तरी वेड्यापेक्षां वेडा होतो, व बेशुद्धीमध्यें अनेक तऱ्हेनें आपला हंशा करवून घेऊन आपली अब्रू घालवून जन्माचें नुकसान करून घेतो. ही गोष्ट साधारण स्थितींतल्या मनुष्याची झाली. ज्याच्या हातीं सत्ता असते अशा मनुष्यास दारूचें व्यसन असल्यास तो आपल्याबरोबर आपल्या भोंवतालच्या मनुष्यावरही संकटें आणतो. त्यांतून राजसत्ताच हातीं असल्यास मग त्यामुळें

काय अनर्थ ओढवतात हें संभाजी महाराजांच्या चरित्रावरून सहज लक्ष्यांत येण्याजोगें आहे.

शिवाजी राजांनीं संभाजी महाराजांस उत्तम शिक्षण देण्याचा किती प्रयत्न केला होता हें तुम्ही मागें वाचलेंच आहे. त्या शिक्षणाचा जर महाराजांनीं योग्य उपयोग करून घेतला असता तर संभाजी महाराजांवर व मराठी राज्यावर जो दुर्धर प्रसंग आला तो खचित आला नसता.

शेवटीं, मुलांनों, तुम्हांस सांगावयाचें कीं, आपले वडील आपणांस लहानपणीं जें शिक्षण देतात तें केवळ आपल्या बऱ्यासाठीं असतें हें लक्षांत ठेवून आपल्या वडिलांचे आज्ञाधारक बना व व्यसनाधीन होऊं नका, म्हणजे तुम्हांस इहलोकीं सुख मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. संभाजी महाराजांचें वरील लहानसें चरित्र तुम्ही लक्ष्यांत आणिल्यास या म्हणण्याचा खरेपणा तुमच्या सहज लक्ष्यांत येईल.

समाप्त.

## श्रीसयाजी बालज्ञानमाला.

| छापेलीं पुस्तकें. | किंमत. |
| --- | --- |
| १ गिरनारनुं गौरव ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| ३ शरीरनो संचो ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| ४ महाराणा प्रताप ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| ५ कोषना कथा ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| ६ पाटण सिद्धपुरनो प्रवास ( बीजी आवृत्ति ) | ०–६–० |
| ७ पावागढ ( बीजी आवृत्ति ) | ०–६–० |
| ८ औरंगजेब ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| ९ मधपुडो ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| १० रणजितसिंह ( बीजी आवृत्ति ) | ०–६–० |
| ११ सुखी घर ( बीजी आवृत्ति ) | ०–६–० |
| १३ सूर्यकीरण ( बीजी आवृत्ति ) ( सचित्र ) | ०–६–० |
| १४ वातावरण ( बीजी आवृत्ति ) | ०–६–० |
| १५ ग्रहण (सचित्र) | ०–६–० |
| १६ बाल नेपोलियन | ०–६–० |
| १७ कोषकी कथा ( सचित्र ) ( हिन्दी ) | ०–८–० |
| १८ लोहीनी लीला | ०–६–० |

| | | |
|---|---|---|
| १९ श्रीहर्ष | ( हिन्दी ) | ०-८-० |
| २० सिकंदरनी स्वारी | | ०-६-० |
| २१ सुरत | | ०-६-० |
| २२ एशियानी ओळखाण, भाग पहेलो | | ०-६-० |
| २३ भूस्तरनी कथा | | ०-६-० |
| २४ लॉर्ड विलियम बेन्टिक | | ०-६-० |
| २५ नाना फडनविस | | ०-६-० |
| २६ चंद्र | | ०-६-० |
| २७ वडोदरानो वैभव | | ०-६-० |
| २८ महादजी सिंधिया | | ०-६-० |
| २९ घरधोणी | | ०-६-० |
| ३० चांचड | | ०-६-० |
| ३१ पाचनक्रिया अने दूध | | ०-६-० |
| ३२ एशियानी ओळखाण, भाग बीजो | | ०-६-० |
| ३३ गर्भनी कथा | | ०-६-० |
| ३४ बाल बाबर | | ०-६-० |
| ३५ नाडीतंत्र | | ०-६-० |
| ३६ बौद्ध गुफाओ | | ०-६-० |
| ३७ महाबळेश्वर | | ०-६-० |
| ३८ हिंदुस्थाननुं वहाणवटुं | | ०-६-० |
| ३९ जाति अने ज्ञाति, भाग पहेलो | | ०-६-० |

| | | |
|---|---|---|
| ૪૦ જાતિ અને જ્ઞાતિ, ભાગ બીજો | | ૦-૬-૦ |
| ૪૧ વિલિયમ યુવર્ટ ગ્લૅડસ્ટન | | ૦-૬-૦ |
| ૪૨ શૂરવીર શિવાજી | (સચિત્ર) | ૦-૬-૦ |
| ૪૩ આરોગ્યતા | (સચિત્ર) | ૦-૮-૦ |
| ૪૪ દરિયાકાંઠો | (સચિત્ર) | ૦-૬-૦ |
| ૪૫ બરફ અને પાણી | | ૦-૬-૦ |
| ૪૬ અર્થશાસ્ત્રની ઓળખાણ | | ૦-૬-૦ |
| ૪૭ છત્રપતિ સંભાજી | | ૦-૬-૦ |

E
148